मासिक वार्तापत्र • प्रवेशांक • ऑगस्ट २०१५ • सहयोग राशी - रु. ५ • १२ पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


मालवणी दारुकांडाने घडवले भ्रष्ट व्यवस्थेचे विद्रूप दर्शन ३

सांप्रदायिक वातावरण तयार करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुन्हा सक्रिय १०

इंडोनेशिया मधील १० लाख कम्युनिस्टांच्या शिरकाणाची ५० वर्षे ११


## ‘कामगार बिगुल’ आपल्यामध्ये कशासाठी?

संपादक मंडळ

आम्ही ‘कामगार बिगुल’चा प्रवेशांक घेऊन आपल्यामध्ये आलोय. एका कठीण आणि महत्त्वहपूर्ण काळात आम्ही हे मराठी कामगार वृत्तपत्र घेऊन तुमच्यामध्ये आलोय. साहजिकच आपल्या मनात हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की **कामगारांच्या स्वतंत्र वृत्तपत्राची गरज काय?** ह्याची बरीच कारणे आहेत. परंतु आपण सर्वप्रथम त्या कारणाबद्दल बोलूयात जे आपण सर्व कामगारांना माहित आहे.

**आज जेवढीही वृत्तपत्रे व वाहिन्या आहेत, ती कोणाच्या मालकीची आहेत? त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण आहे?** त्यांच्यावर एक तर अंबानी, अदानी, टाटा, बिर्लासारख्या मोठमोठ्या भांडवलदारांचे नियंत्रण आहे किंवा मग ह्या भांडवलदारांचे हस्तक बनून काम करणाऱ्या सरकारचे नियंत्रण आहे. ज्या वृत्तपत्रांवर प्रत्यक्षपणे कुठल्याही मोठ्या औद्योगिक घराण्याचे वर्चस्व नाही, ती वृत्तपत्रे सुद्धा भांडवलदारांकडून दिल्या जाणाऱ्या जाहिरातींवर चालतात. म्हतणूनच ह्या वृत्तपत्रांमध्ये व वृत्त वाहिन्यांवर कधीही कामगार-कष्टकरी वर्गाचे जीवन, त्यांची दु:खे आणि समस्या ह्यापैकी कोणतीच गोष्ट लिहिण्यात, दाखवण्यात येत नाही. **ह्या वृत्तपत्रांच्या दृष्टींने मालक व भांडवलदार हा नेहमीच बरोबर असतो आणि कामगार नेहमीच चूक असतात!** जर कामगारांनी आपल्या हक्कासाठी आवाज उठवला किंवा संप केला, तर ह्या वृत्तपत्रांच्या मते आपोआपच ते समाजकंटक, दंगेखोर, अराजकतावादी व आतंकवादी ठरतात! जर का कामगारांनी किमान वेतनाची मागणी केली असेल, आठ तासांच्या कामाच्या दिवसाची मागणी केली असेल, “देशाच्या प्रगतीसाठी” ते पोटावर पट्टी बांधून उपाशी पोटी झोपण्यासाठी तयार नसतील तर मग ते “देशद्रोही” व “विकासातील बाधा” आहेत! धनदांडग्यांच्या ह्या वृत्तपत्रांच्या मते मालक नेहमीच बरोबर असतात आणि कामगार नेहमीच चूक! **असे असूनही आपण धनदांडग्यांच्या ह्या गल्लाभरू वृत्तपत्रांना वाचण्यासाठी बाध्य आहोत. कारण कुठलाही जिज्ञासू कामगार देशात, जगात काय चालू आहे हे जाणून घेऊ इच्छितो.**

> **आज जेवढीही वृत्तपत्रे व वाहिन्या आहेत, ती कोणाच्या मालकीची आहेत? त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण आहे? त्यांच्यावर एक तर अंबानी, अदानी, टाटा, बिर्लासारख्या मोठमोठ्या भांडवलदारांचे नियंत्रण आहे किंवा मग ह्या भांडवलदारांचे हस्तक बनून काम करणाऱ्या सरकारचे नियंत्रण आहे. ज्या वृत्तपत्रांवर प्रत्यक्षपणे कुठल्याही मोठ्या औद्योगिक घराण्याचे वर्चस्व नाही, ती वृत्तपत्रे सुद्धा भांडवलदारांकडून दिल्या जाणाऱ्या जाहिरातींवर चालतात.**

**परंतु आपल्याला ह्या वृत्तपत्रांमधून त्या गोष्टी सांगण्यात येतात ज्या भांडवलदार आपल्याला सांगू इच्छितात; आपल्याला जे आपले वर्गीय मित्र आहेत त्यांच्याबद्दल तिरस्कार करायला आणि जे आपले वर्गीय शत्रू आहेत त्यांच्याबद्दल सद्भाव ठेवण्यास शिकवले जाते.** आपल्याला सामान्य तथ्ये सुद्धा असा प्रकारे सांगितली जातात की त्यामुळे भांडवलदारांचा फायदा व्हावा आणि कामगार वर्ग आणि त्याच्या राजकारणाचे नुकसान व्हावे! आपण कामगार भांडवलदारांचे वृत्तपत्रे व वाहिन्यांकडून निष्पक्षता, न्याय ह्याची अपेक्षा ठेऊ शकत नाही. ही सर्व भांडवलदारांची मुखपत्रे आहेत आणि त्यांच्या फायद्यासाठी चालतात. कामगार वर्गाचे त्याचे स्वतःचे वृत्तपत्र का असावे ह्याचे हेच सर्वात पहिले आणि सहज समजू शकणारे कारण आहे. परंतु केवळ देश-जगभरातील घटना कामगाराच्या नजरेतून जाणून घेणे एवढेच पुरेसे नाही. कारण प्रश्न केवळ जग जाणून घेण्याचा नाही तर त्याला बदलण्याचा आहे. त्यामुळेच आपण ‘कामगार बिगुल’ची गरज काय ह्या बद्दल थोडंसं सविस्तर जाणून घेऊयात.

### असमाधेय भांडवली संकट आणि कामगार चळवळ

संपूर्ण जागतिक भांडवली अर्थव्यवस्था आज आर्थिक संकटात आहे. व्यवस्थेची चाकरी करणाऱ्या भांडवली अर्थतज्ज्ञांनी सुचवलेले विविध उपाय काम करेनासे झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थासुद्धा संकटात सापडली आहे. कामगार विरोधी मोदी सरकारकडून विकासाचे कितीही दावे केले जात असले तरी कामगार-कष्टकरी जनतेच्या पदरात शोषण, बेरोजगारी आणि महागाई ह्या व्यतिरिक्त दुसरे काहीही पडलेले नाहीये. खरं तर आज सगळ्या जगातच भांडवली व्यवस्था

पान ६ वर

## श्रम सुधारांच्या नावाखाली मोदी सरकारचा कामगारांच्या हक्कांवर हल्ला तीव्र

विकासाच्या चांगल्या दिवसांच्या आश्वासनांचा सौदा करत, नफा रेटण्याच्या मार्गावरील अडथळे दूर होण्याची वाट पाहणाऱ्या भांडवलदारांना आणखी एक ओवाळणीची भेट देण्यासाठी मोदी सरकारने कुख्यात श्रमसुधारांना गती देण्याचे काम सुरू केले आहे. या संबंधीची विधेयके येत्या मान्सून सत्रामध्ये संसदेत मांडण्यासाठी सरकारने कंबर कसली आहे.

यामध्ये पहिले आहे बालमजुरी (निषेध आणि नियम) संशोधन विधेयक, ज्याला कामगार मंत्री बंडारू दत्तात्रेय यांनी अगोदरच मान्यता दिलेली आहे. या विधेयकानुसार मुलांना संघटित क्षेत्रामधील उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास सक्त मनाई केलेली आहे, परंतु कुटुंबातील छोटेखानी असंघटित क्षेत्रामध्ये हातभार लावण्याची परवानगी असेल. मोठ्या संघटित क्षेत्रात आतापर्यंत बालमजुरी औपचारिकरित्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे हे सत्य असले तरी सर्वाधिक बालमजुरी ही असंघटित क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात होत होती. आजच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये असेंब्ली लाईनचे अशा प्रकारे तुकडे करून छोट्या छोट्या वर्कशॉप्समध्ये मजुरांची भलीमोठी संख्या अनौपचारिक आणि असंघटित झाली आहे. या साखळीमध्ये सगळ्यात खाली गृहउद्योग येतो, जेथे काम ठेक्यावर घेऊन नगाच्या भावाने हिशेब केला जातो, जेथे मजुरी विषयक कायद्याला बगल देऊन त्यांचा जास्तीत जास्त फायदा घेण्यात येतो. अशा गृहउद्योगात किंवा नगानुसार काम करणाऱ्या बालकामगारांवरील औपचारिक बंदी हटवून (कारण कायद्याचे बंधन असताना देखील या कामात बालमजुरांचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता, त्यावर त्यांची उपजीवीका भागत होती.) मोदी सरकार या नवउदारवादाच्या काळात मुलांच्या हाडाहाडातून नफा उकळण्याच्या शक्यता अनिर्बंध करू इच्छित आहे. मार्क्सच्या भांडवल खंड १ मध्ये याचा विशेष उल्लेख केलेला आहे. तसेच चार्ल्स डिकेन्सच्या कादंबऱ्या तसेच औद्योगिक कादंबऱ्या म्हणून विख्यात बऱ्याच कृतींमध्ये या क्रूर यथार्थाचे ग्राफिक चित्रण अशाप्रकारे केले आहे की इंग्लंडमध्ये १९व्या शतकामध्ये भांडवलशाही कशा प्रकारे स्त्रिया आणि मुलांच्या श्रम आणि अतिशोषणाच्या जोरावर विकसित झाली होती. नवउदारवादाच्या काळामध्ये सगळ्या प्रकारच्या कल्याणकारी योजना कचरापेटीत फेकून दिल्यानंतर आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांसारख्या मागासलेल्या भांडवलशाही देशांमध्ये पुन्हा एकदा पूर्वस्थिती निर्माण झालेली आपल्या निदर्शनास येते आहे. भारतामध्ये बालमजुरीवर बंदी आणि सर्वशिक्षणाच्या सर्व वादे फक्त तोंडी आश्वासने होऊन बसली आहेत. कामगाराला आपल्या मजुरीतून कुटुंबाचे पोषण करण्यालायकसुद्धा मजुरी मिळत नाही. त्यामुळे त्याला आपल्या मुलाबाळांना कामावर पाठवून त्यातून आपल्या कुटुंबाचे पोषण करावे लागते, हे कटू सत्य आहे. जर बालमजुरीवर कायद्याने बंदी केली, आणि जरी मजुरांची मुले कशीबशी शाळेत गेली तरीही खाजगीकरणाच्या या काळात सरकारी शाळांमधील शिक्षणपद्धतीमुळे गरीबी त्यांच्या शिक्षणाच्या आड येते. भांडवली राक्षस कष्टकरी मुलांकडून त्यांचे बालपण हिरावून घेऊन त्यांची हाडे पिळण्याचे काम आधीपासूनच करीत आहे. आता या प्रक्रियेला पूर्णपणे अनिर्बंध करण्याची कायद्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

मंत्रीमंडळाच्या मंजुरीसाठी केंद्रीय श्रममंत्री बंडारू दत्तात्रेय द्वारा प्रस्तुत दुसरे विधेयक दि स्मॉल फॅक्टरीज (रेग्युलेशन ऑफ एंप्लॉयमेंट ॲण्ड कंडिशन ऑफ सर्विसेस) बिल आहे. या विधेयकामध्ये प्रत्येक कारखानदारांला श्रमिक

पान २ वर

# सर्व कामगारांनी संघटित झाले पाहिजे

माझं नाव मोहम्मद मेहताब आहे आणि मी मुंबईतील मण्डालातील एका स्टील कारखान्यामध्ये काम करणारा कामगार आहे. ज्या कारखान्या मध्ये मी काम करतो तिथे 25 ते 30 लोक काम करतात, ज्यापैकी 10 ते 12 महिला आहेत. इथे जवळच आणखी दोन कारखाने आहेत. या तीन कारखान्यांमध्ये मिळून जवळपास 350 कामगार काम करतात त्यात जवळपास 200 महिला कामगार आहेत. या कारखान्यांमध्ये स्टील पोलिशिंगचे अत्यंत धोकादायक काम चालते. स्टील लाइन मधली बहुतांश कामे तशीही अत्यंत धोकादायक असतात आणि कारखान्यांमध्ये दररोजच अपघात घडत असतात. अश्या अपघातानंतर कारखाना मालक कामगारांना किरकोळ उपचार उपलब्ध करतो, परंतु अशा अपघातांमध्ये त्यांना कधीही नुकसान भरपाई दिली जात नाही. अपघातानंतर कारखाना मालक कामगारांना कामावरून काढून सुद्धा टाकतात.

इथे कामाचे तास नक्की नाहित आणि दररोज 12-13 तासांपेक्षा जास्त काम करायला लागते. ज्या दिवशी लोडिंग-अनलोडिंगचे काम असते त्या दिवशी तर 16-16 तास काम करावे लागते. आठवड्या मध्ये 2-3 दिवस लोडिंग-अनलोडिंगचे काम करावे लागते. सध्याची महागाई बघता मुंबई सारख्या शहरामध्ये आम्हाला अत्यंत कमी मोबदला दिला जातो. एकही दिवस सुट्टी न घेता घाम गाळून सुद्धा महीन्या शेवटी 8-9 हजार पेक्षा जास्त कमाई होत नाही. त्यामुळे आम्ही इच्छाअसून सुद्धा आमच्या मुलांना चांगल्या शाळांमध्ये पाठवू शकत नाहीत. इथे कुठल्याच कारखान्याचे रजिस्ट्रेशन झालेले नाही आणि श्रम कायद्यांविषयी कुठल्याही कामगाराला काहीच माहिती नाही. बहुतांश कामगारांना कारखान्यांमध्येच रहावे लागते कारण मुंबईमध्ये रहायला घर मिळणे अत्यंत अवघड आहे. अश्या कामगारांचे तर जास्ताच शोषण होते. आम्हाला शुक्रवारी सुट्टी मिळते पण त्यांना तर दररोज काम करावे लागते.

यापूर्वी मी अलाहाबाद मध्ये रहायचो आणि खताच्या कारखान्या मध्ये काम करायचो. मी अजूनही बऱ्याच शहरांमध्ये काम केले आहे परंतु सर्वच ठिकाणी कामगारांची परिस्थिती सारखीच आहे. माझ्या मते आपण सर्व कामगारांनी संघटित झाले पाहिजे आणि आपल्या हक्कांसाठी संघर्ष केला पाहिजे. आपण आपली मजबूत अशी यूनियन स्थापन करायला हवी, तेव्हांच आपण मालकांशी लढू शकू. आगोदरच अस्तित्वात असलेल्या मोठ्या मोठ्या यूनियन्स कामगारांच्या, हितांसाठी काहीही काम करत नाहीत. आपल्याला अशा यूनियन्स पासून दूर राहिले पाहिजे आणि आपली स्वत:ची क्रांतिकारी यूनियन बनवली पाहिजे.

सहकाऱ्यांनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६९९०३५८९, ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

**बुर्ज्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**



## श्रम सुधारांच्या नावाखाली मोदी सरकारचा कामगारांच्या हक्कांवर हल्ला तीव्र

पान १ वरून

ओळख संख्या देण्याची तरतूद केली आहे. आता प्रत्येक कारखानदार स्वतः एक रिपोर्ट दाखल करून त्याने सगळ्या ४४ श्रम कायद्यांचे पालन केले आहे, असे सत्यापित करेल. ह्यापेक्षा हास्यास्पद बाब दुसरी कुठली असू शकते? म्हणजे कारखानदार स्वतःच तपासणारा आणि स्वतःच साक्षीदार असणार. खरे तर अधिकांश काम ठेक्याने आणि विभिन्न श्रेणीच्या कामगारांद्वारे केले जाणारे छोटे उद्योगधंदेच नाही तर मोठे कारखानेसुद्धा कामगार कायद्याचे पालन करीत नाही. ते नावालाच असतात. श्रम कार्यालय अथवा इन्स्पेक्टराची भूमिका हल्ली दलालाहून जास्त काहीच राहीलेली नाही. आता या स्थितीमध्ये कायद्याच्या चादरीखाली मालकांना मोकळ्या सांडाप्रमाणे सूट दिली आहे. लक्षात घेण्याची बाब अशी की आता लेबर इन्स्पेक्टर नसून फेसिलिटेटर म्हटल्या जाईल त्यांचे काम श्रम कायद्यांचे पालन होते आहे की नाही याची देखरेख ठेवणे नसणार तर ते मालकांसाठी अनुकूल परिस्थिति फेसिलिटेट करणार.

तिसरे विधेयक म्हणजे एम्प्लॉइज प्रॉव्हिडेंट फंड्स ॲलण्ड मिसलेनियस प्रॉव्हिजन्स एक्ट १९५२मध्ये व्यापक संशोधन प्रस्तावित करत आहे. या विधेयकानुसार सर्व कामगारांना आता एपीफ (एम्प्लॉइज प्रॉव्हिडेंट फंड) आणि एनपीएस (न्यू पेंशन स्कीम) यांपैकी एक पर्याय निवडावा लागेल. दुसरे संशोधन म्हणजे पगाराच्या परिभाषेमध्ये आता मूळ पगारासोबत भत्तेसुद्धा जोडलेले आहेत. स्वाभाविकच यामुळे पीएफ मध्ये कामगारांना अंशदान वाढेल. यामध्ये दुसरी तरतूद अशी आहे की दहा किंवा त्यापेक्षा अधिक कामगार असलेले प्रतिष्ठान आता इपीएफच्या कक्षेत येईल. (अगोदर २० किंवा २० पेक्षा जास्त कामगार असलेले प्रतिष्ठान येत होते.) यावरून सरकार अधिकाधिक कामगारांचे भविष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसते आहे, परंतु त्यात काही तथ्य नाही. खरे तर कामगारांच्या संघटनांनी विरोध दर्शविलेला असला तरी हा निर्णय अगोदरच घेण्यात आलेला आहे की कामगारांचा पीएफ संचय ५ ते १५ टक्क्यांपर्यंत स्पेक्युलेटिव्ह शेयर मार्केटकडे वळवला जाईल. ही रक्कम जास्तीत जास्त वाढविण्यासाठी कामगारांच्या पगारातून पीएफ जास्तीत जास्त कापून अधिकाधिक कामगारांना याच्या कक्षेत आणण्यात आले आहे. यासाठी कारखानदारांच्या अतिरिक्त वित्त बाजाराचे सुद्धा बऱ्याच काळापासून सरकारवर दबाव आणीत होते. सरकारचा हा निर्णय, देशातील कामगारांच्या अतिसिमित संख्येसाठी जी अपंग आणि मरगळलेली सामाजिक सुरक्षेची योजना होती, तिला खिळे ठोकण्याचीच सुरुवात आहे. इपीएफच्या बदल्यात नेशनल पेंशन स्कीमचा जो पर्याय दिला जातो आहे तो मात्र एक सामान्य बचत स्कीम आहे. इपीएफ धारकाच्या परिवाराला त्याचा जो लाभ मिळत असे तो एनपीएस कडून मिळणार नाही. यामागचा डाव हा आहे की आणखी काही दुरुस्त्यांद्वारे छोट्या कारखान्यांना मदत करण्याच्या नावाखाली सरकारची आता अशी तरतूद आहे की १० ते ४० कामगारांच्या कारखान्यांच्या मजुरांना आता इपीएफचा पूर्वीपेक्षा कमी लाभ मिळेल. ७५ टक्के औद्योगिक कामगार असेच काम करतात.

वास्तव हे आहे की छोट्या छोट्या कारखान्यांपासून गृहउद्योगांपर्यंत ठेका, उपठेका आणि उत्पादनाच्या नगाच्या कामाची वाटणी अशा प्रकारे केली आहे की त्यामध्ये काम करणाऱ्या बहुतेक कामगारांचे कुठलेही रेकॉर्ड ठेवले जात नाहीत. ठेका, कॅजुअल किंवा अप्रेंटिस कामगारांना कायद्याने मिळालेले हक्कसुद्धा त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. वास्तविक पाहता हे कामगार सरकार आणि श्रमविभागासाठी अस्तित्त्वातच नाहीत. नवीन श्रमसुधारांद्वारे श्रम विभागाला एकदम प्रभावहीन बनवून अशा प्रकारे अनौपचारिकीकरणाला आता जास्तीत जास्त प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे विदेशी कंपन्या आणि देशातील लहानमोठे भांडवलदार मोकळ्या हाताने आणि मनमानी करून आपला फायदा उकळू शकतात.

मोदी यांनी मेक इन इंडियाला गती देण्यासाठी प्रस्तावित श्रमसुधाराची ही फक्त सुरुवात आहे. हा फक्त ट्रेलर आहे, पूर्ण पिक्चर येत्या दोन तीन वर्षांत रिलीज होईल. बुर्ज्वा आणि संसदमार्गी डाव्या पक्षांच्या युनियननी मजुरांच्या अत्यंत मर्यादित आर्थिक हितांचे रक्षण करण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची ताकद आणि हिम्मत कवडीमोल सौदेबाजी करत करत पूर्णपणे गमावली आहे. तसेही देशात एकूण कामगारांच्या ९० टक्क्यापेक्षा जास्त असंघटित कामगार आहेत. त्यांपैकी त्यांचे वास्तव्य फक्त शीरगणतीपुरतेच आहे. आता पांढरपेशा कामगार, कुलीन कामगार आणि सर्व्हिस सेक्टरच्या मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांमध्येच या युनियनचा वास्तविक आधार बाकी आहे आणि वास्तव हे आहे की नवउदारवादाचे फटके समाजाच्या या संस्तरालासुद्धा बसत आहेत. आणि ही युनियन त्यांच्या मागण्यांसाठी प्रभावी विरोध उभारण्यातही अक्षम होत चालली आहेत. आता मार्ग फक्त एकच उरला आहे. गावातील आणि शहरांतील कष्टकरी वर्गाला राजकीय कारवाईद्वारे, जीवनाच्या अधिकारासोबत सगळ्या लोकशाही अधिकारांसाठी संघर्षाच्या उद्देशाने, त्यांच्या विशिष्ट व्यवसायांच्या चौकटीचे अतिक्रमण करून गल्ली गल्लीत त्यांच्या संघटना उभाराव्या लागतील. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रांतही अशी व्यवसायाधिष्ठित युनियन संघटित करावी लागतील ज्यांच्या द्वारे ठेका कामगार आणि सर्व स्तरावरील अनियमित कामगार हे एकत्र उभे राहतील.

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**

www.marathi.mazdoorbigul.net

**फेसबुक पेज**

www.facebook.com/kamgarbigul


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : नारायण खराडे, विराट चौधरी

संपादकीय कार्यालय : रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९७६९९०३५८९, ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. ७० (टपाल शुल्कासह)

# मालवणी दारुकांडाने घडवले भ्रष्ट व्यवस्थेचे विद्रूप दर्शन

मुंबईतील सर्वांत भीषण विषारी दारू दुर्घटना ठरलेल्या मालवणी, मालाड दारुकांडात शंभरच्या वर लोकांचे बळी गेले. यातील बहुतेक जण कष्टकरी होते, व कुटुंबातील एकमेव कमावणारा सदस्य होते. सरकारकडून मृतांचा अधिकृत आकडा १०६ सांगण्यात येत असला तरी प्रत्यक्षात त्याहून जास्त माणसे मृत्यूमुखी पडली आहेत व कित्येकांना अपंगत्व आलेले आहे. दुर्घटनेनंतर विषारी दारूविक्रीच्या आरोपाखाली ३ दोषी व्यक्तींना पकडण्यात आले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना फक्त १ लाख रुपयांची मदत देऊन तसेच काही पोलिस व अबकारी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून सरकार आपली जबाबदारी झटकू पाहत आहे. या दारुकांडाने पोलिस विभाग व अबकारी खात्याचा तसेच आरोग्य खात्याचाही भ्रष्टाचार व नाकर्तेपणा चव्हाट्यावर आणलाच आहे, त्याचबरोबर ही एकूणच व्यवस्था कष्टकरी गरीब जनतेवर पावलोपावली किती घोर अत्याचार करणारी आहे, त्याचे अत्यंत हृदयद्रावक दर्शन घडवलेले आहे.

विषारी दारुमुळे लोकांना जीव गमवावा लागण्याची ही काही पहिलीच घटना नाही. या अगोदर २००४ साली मुंबईतच विक्रोळी येथे झालेल्या अशाच दारुकांडात जवळपास १०० लोक मृत्यूमुखी पडले होते. उत्तरप्रदेशमध्ये सप्टेंबर २००९ आणि नंतर जानेवारी २०१५ मध्ये अशाच प्रकारे ७० लोक मरण पावले. २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये सुमारे १७० व गुजरातमध्ये २००९ साली १०० हून जास्त लोकांचे अशाच प्रकारे बळी गेले आहेत. या दुर्घटनेने पोलिस विभाग तसेच अबकारी खात्याच्या भ्रष्ट कारभाराची लक्तरे वेशीवर टांगल्यानंतर वास्तविक गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री एकनाथ खडसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपापल्या पदांचा राजीनामा देणे अपेक्षित होते. मात्र त्या उलट, घटनास्थळाला भेट देऊन पीडितांचे सांत्वन करण्याची संवेदनशीलतादेखील त्यांनी दाखवली नाही. उलट या बेकायदेशीर दारुचा व्यापार कसा लपूनछपून चालायचा व याबाबत पोलिस व अबकारी खाते कसे अनभिज्ञ होते, ते सिद्ध करण्याचा केविलवाणा प्रयत्न काही प्रसारमाध्यमांना हाताशी धरून करण्यात आला. या परिसरात तसेच मुंबईत इतर ठिकाणीदेखील बेकायदेशीर दारुचे अड्डे पोलिस तसेच अबकारी अधिकाऱ्यांना हप्ते पोचवून त्यांच्या आशिर्वादानेच चालतात व हे हप्ते फक्त छोट्या मोठ्या स्थानिक पोलिसांच्या खिशातच जातात असे नाही तर अगदी वरपर्यंत – आमदार,



खासदार, मंत्र्यांपर्यंत- ते पोचत असतात, हे सर्वांनाच माहीत आहे.

दि. १७जून रोजी हे प्रकरण उघडकीस येताच बाधित रुग्णांना ताबडतोब योग्य उपचार मिळाले असते तर निदान काही लोकांचे जीव वाचू शकले असते. परंतु रुग्णांपैकी बहुतेकांना गंभीर अवस्थेत




प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाण्याचंसुद्धा राजकीय पक्षांनी सोडलं नाही. स्वतःला दलित हितांचे संरक्षक म्हणवणाऱ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाने आपल्याच युतीच्या सरकारवर दबाव टाकून पीडितांना नुकसान भरपाई मिळवून देण्याऐवजी दोन चार किलो धान्य आणि बिस्किटे वाटून जणू पीडितांची थट्टा केली. निर्लज्जपणाचा कळस म्हणजे या दुःखाच्या प्रसंगीदेखील धान्याच्या लहान लहान पाकिटांवर आपले भलेमोठे स्टीकर लावायला ते विसरले नाहीत.


नजीकच्या ज्या शताब्दी इस्पितळात दाखल करण्यात आले तेथे उपचाराच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या. सुविधांच्या अभावाला डॉक्टरांची अनास्था आणि बेजबाबदारपणा यांची जोड मिळाल्याने रुग्णांवर कोणत्याही प्रकारे उपचार होऊच शकले नाही. वास्तविक अशा आणीबाणीच्या प्रसंगी खाजगी इस्पितळांकडून मदत मिळविणे सरकारला शक्य होते, परंतु तशी तत्परता प्रशासनाने दाखवली नाही. उलट ज्या काही रुग्णांना खाजगी इस्पितळांत भरती करण्यात आले, तेथे त्यांच्याकडून भरमसाठ फी उकळण्याचे प्रकार घडले, तसेच काही प्रकरणी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यासाठीसुद्धा कित्येक हजार रुपये घेण्याचा निर्लज्जपणा खाजगी इस्पितळातील डॉक्टरांनी केला.

घटनेनंतर स्थानिक आमदार अस्लम शेख यांना घटनास्थळाला भेट देण्यासही कित्येक दिवस वेळ मिळाला नाही. सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना १ लाख रुपयांची तुटपुंजी मदत जाहीर केली खरी पण या दुर्घटनेत अपंगत्व आलेल्यांना कोणत्याही प्रकारची मदत देण्याची बुद्धी सरकारला झाली नाही. वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे सादर करावी लागत असल्याने सरकारने चेकद्वारे दिलेली १ लाख रुपयांची मदत मिळविण्यात देखील मृतांच्या कुटुंबीयांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कित्येक कुटुंबांवर हे भीषण संकट कोसळलेले असताना त्यांना योग्य मदत मिळवून देण्याऐवजी विरोधी पक्ष केवळ या संधीचा लाभ घेऊन आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करताना दिसून आले. तसेच अनेक न्यूज चॅनेल्सकडून या दुर्घटनेच्या सनसनाटी बातम्या बनविण्यासाठी पीडितांच्या दुःखाचा बाजार मांडण्याचे अत्यंत हिडीस प्रकार पाहावयास मिळाले. त्यापलीकडे पीडित कुटुंबियांना न्याय देण्याच्या दृष्टीने प्रसारमाध्यमांनी काहीही केले नाही. या एकूणच प्रकरणात कष्टकरी गरीब माणसाचे जीवन पैशावर आधारलेल्या या व्यवस्थेत कसे कवडीमोल ठरते त्याचाच वारंवार प्रत्यय आला आहे.


असंख्य लोकांचा जीव घेणाऱ्या आणि त्यांच्या कुटुंबियांना निराधार करणाऱ्या या दुर्घटनेला जबाबदार कोण हा येथे खरा प्रश्न आहे. या दुर्घटनेनंतर पीडितांना मदत दिल्यामुळे दारू पिण्याला उत्तेजन मिळत असल्याचे सांगून पीडितांना मिळणाऱ्या मदतीला विरोध करण्याचा खोडसाळपणाही झाला. परंतु या दारुकांडात मृत्यूमुखी पडलेल्यांपैकी कोणीही दारुडे नव्हते, तर बारा बारा तास कष्टाची कामे करून मिळणाऱ्या जेमतेम पगारात ते आपले घर चालवीत होते. कुणी सफाई कामगार होते, कुणी सेक्युरिटी गार्ड होते, कुणी इलेक्ट्रिशियन होते. समाजाच्या मूलभूत गरजेची कामे करणाऱ्या लोकांचे या दारुकांडात जीव गेलेले आहेत. कमावता माणूस गेल्यामुळे त्यांच्या मागे त्यांच्या बायकामुलांवर रस्त्यावर येण्याची पाळी येऊ शकते. अशा वेळी त्यांना आधार देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर, प्रश्न दारू पिण्याला समर्थन देण्याचा नाही, मात्र ही माणसे नशेचा आधार कां घेतात, हे समजून घेणेदेखील गरजेचे आहे. कष्टकरी वर्गात दारूसारखी व्यसने सर्रास दिसून येतात. पण त्यामागे मौज करण्याचा हेतू नसतो. दिवसभर अत्यंत बिकट परिस्थितीत कष्टाची कामे करूनही जेमतेम आठ दहा हजार रुपये हाती पडतात. अति श्रम व अति मानसिक तणावाचा बळी ठरल्यामुळे नशेचा आधार घेणे भाग पडते. याचा परिणाम कौटुंबिक जीवनावरही होतो. बऱ्याचदा कुटुंबियांनाही त्रास सहन करावा लागतो. परंतु, दारूमुळे या सर्व समस्या निर्माण होतात असे नाही, तर असंख्य समस्यांनी ग्रासलेल्या जीवनाचे ओझे सहन न झाल्यामुळे माणूस व्यसनांकडे वळतो, हे वास्तव आहे. तशातच हलाखीच्या परिस्थितीमुळे स्वस्तात मिळणारी हातभट्टीची दारू घेण्यावाचून पर्याय नसतो. हातभट्टीवर मिळणाऱ्या या दारुमध्ये मिथेनॉल वा पेस्टीसाईडचादेखील वापर केला जातो, व एकूणच धंदा बेकायदेशीर असल्याने त्यांचे प्रमाणही कमी जास्त होत राहते, व ते मर्यादेबाहेर जाताच अशा प्रकारच्या दुर्घटना घडतात. मात्र, हे प्रमाण कमी राहिले तरी बराच काळ अशा दारुचे सेवन केल्यानंतर गंभीर शारीरिक व्याधी निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच, व्यसनमुक्ती आवश्यक आहेच, परंतु केवळ व्यसनमुक्तीचे उपदेश देऊन सामाजात व्यापक व्यसनमुक्ती साध्य होऊ शकत नाही, तर व्यसनमुक्तीसाठी लोकांचा जीवनस्तर उंचावणे, त्यांना चांगले जीवन मिळणे गरजेचे आहे. आणि जनतेला चांगले जीवन देणे हे सरकारचे काम असते. आपली ही जबाबदारी पार पाडण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्यानेच अशा दुर्घटना घडत असतात. दोष व्यक्तीचा नाही, तर पैशावर आधारलेल्या या व्यवस्थेचा आहे. अगोदर ही व्यवस्था हालअपेष्टेचे जीवन लादून कष्टकरी माणसाला नशेच्या आहारी जायला लावते, आणि नंतर त्याच्या नशेच्या गरजेचाही पैसा कमावण्यासाठी उपयोग करून घेते. म्हणूनच या हत्याकांडाची खरी गुन्हेगार ही व्यवस्था आहे, हे विसरून चालणार नाही.

पीडित कुटुंबियांना योग्य आर्थिक मदत मिळणे, कुटंबातील एका सदस्याला कायमस्वरूपी सरकारी नोकरी मिळणे व यापुढे अवैध दारूविक्री पूर्ण बंद होणे आवश्यक आहे. परंतु ते सहजासहजी होणार नाही. त्यासाठी पीडित कुटुंबियांनाच एकत्र येऊन संघर्ष करावा लागणार हे उघडच आहे. एकजुटीच्या बळावरच पीडित कुटुंबांना न्याय मिळू शकतो.


**•नारायण खराडे**




**अमित जाधव यांनी सांगितले की त्यांचे वडील धडधाकट होते व विषारी दारुने त्यांचा अकस्मात जीव घेतला. इस्पितळात नेले असता त्यांना फक्त बेडवर ठेवण्यात आले. मृत्यूनंतरदेखील मृतदेह ताब्यात मिळण्यासाठी नातेवाईकांना रात्रभर ताटकळत राहावे लागले.**




**श्रीमती भालेकर यांनी सांगितले की पती इस्पितळात दाखल असताना मानसिक ताणामुळे त्यांना स्वतःला भोवळ आली असता त्यांना ऑक्सिजन लावण्यात आला. विषारी दारूने बाधित रुग्णांनासुद्धा अशाच प्रकारे फक्त ऑक्सिजन लावण्यात येत होता. एकूणच ऑक्सिजन लावून उपचार करण्याचे निव्वळ नाटक शताब्दी इस्पितळात केले जात होते, असे त्यांनी सांगितले.**




**दीपिका इंदुलकर यांनी सांगितले की पोलिसांनी आपले कर्तव्य अगोदर बजावले असते तर असंख्य लोकांना जीव गमवावा लागला नसता. पोलिस फक्त हप्ते गोळा करण्याचे काम करतात. बेघर माणसाला एक झोपडी बांधायची असेल तर पैसे मागायला पोलिस ताबडतोब पोचतात. पैसे दिले नाही तर झोपडे मोडून टाकतात. या प्रकरणात डॉक्टरांनीदेखील रुग्णांचे जीव वाचवण्यासाठी काहीही धडपड केली नाही, असा आरोपही त्यांनी केला.**

# दारुकांडातील पीडितांना मदत मिळवून देण्यासाठी संघर्ष समिती स्थापन

मालवणी दारुकांडानंतर सरकार तसेच लोकप्रतिनिधींचे उपेक्षेचे धोरण लक्षात घेऊन पीडितांच्या कुटुंबियांनी न्याय्य मदत मिळविण्यासाठी २८ जून रोजी मालवणी दारूकांड संघर्ष समिती स्थापन केली. बिगुल मजदूर दस्ता तसेच युनिव्हर्सिटी कम्युनिटी फॉर डेमोक्रेसी ॲण्ड इक्वॉलिटी या विद्यार्थी संघटनेच्या सदस्यांच्या पुढाकाराने ही संघर्ष समिती स्थापन करण्यात आली. मृतांच्या कुटुंबियांना रु. १० लाख तसेच अपंगांना रु. ५ लाख मदत, मृतांच्या कुटुंबातील एका सदस्याला कायमस्वरूपी सरकारी नोकरी, भविष्यात राज्यभरातील सरकारी इस्पितळांमध्ये सुयोग्य आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच अवैध दारुविक्री बंद या प्रमुख मागण्यांसह अन्य मागण्यांसाठी संघर्ष समितीच्या वतीने दि. ३० जून रोजी आझाद मैदान येथे निषेध मोर्चा तसेच धरणे आयोजित करण्यात आली.




या धरण्याच्या वेळी बोलताना बिगुल मजदूर दस्ताच्या सत्यनारायण यांनी सांगितले की एवढ्या मोठ्या प्रमाणात होणारी अवैध दारुविक्री पोलिस व अबकारी अधिकारी यांच्या आशिर्वादानेच होत होती हे उघड आहे. त्यामुळे सरकारला या हत्याकांडाची जबाबदारी झिडकारता येणार नाही. दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे, पण त्याचबरोबर या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले बहुतेक जण हे कुटुंबाचा एकमेव आधार होते. त्यामुळे त्यांच्या मागे कुटुंबियांना भरीव साहाय्य देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. नारायण खराडे यांनी सांगितले की या एकंदर प्रकरणात पीडित आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असल्याने सरकारने त्यांची उपेक्षा चालविली आहे. म्हणूनच न्याय्य मदत मिळवण्यासाठी पीडितांनाच आपली एकजूट बांधून संघर्ष करण्यावाचून पर्याय नाही. ज्यांच्या कार्यक्षेत्रात या दारुभट्ट्या चालत होत्या त्या आमदार व खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणीसुद्धा त्यांनी केली. दीपिका इंदुलकर यांनी सांगितले की पोलिसांनी आपले कर्तव्य अगोदर बजावले असते तर असंख्य लोकांना जीव गमवावा लागला नसता. पोलिस फक्त हप्ते गोळा करण्याचे काम करतात. बेघर माणसाला एक झोपडी बांधायची असेल तर पैसे मागायला पोलिस ताबडतोब पोचतात. पैसे दिले नाही तर झोपडे मोडून टाकतात. या प्रकरणात डॉक्टरांनीदेखील रुग्णांचे जीव वाचवण्यासाठी काहीही धडपड केली नाही, असा आरोपही त्यांनी केला. श्रीमती भालेकर यांनी सांगितले की पती इस्पितळात दाखल असताना मानसिक ताणामुळे त्यांना स्वतःला भोवळ आली असता त्यांना ऑक्सिजन लावण्यात आला. विषारी दारूने बाधित रुग्णांनासुद्धा अशाच प्रकारे फक्त ऑक्सिजन लावण्यात येत होता. एकूणच ऑक्सिजन लावून उपचार करण्याचे निव्वळ नाटक शताब्दी इस्पितळात केले जात होते, असे त्यांनी सांगितले. अमित जाधव यांनी सांगितले की त्यांचे वडील धडधाकट होते व विषारी दारुने त्यांचा अकस्मात जीव घेतला. इस्पितळात नेले असता त्यांना फक्त बेडवर ठेवण्यात आले. मृत्यूनंतरदेखील मृतदेह ताब्यात मिळण्यासाठी नातेवाईकांना रात्रभर ताटकळत राहावे लागले.

यावेळी आपल्या मागण्या मांडण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या भेटीची आंदोलकांची मागणी होती. परंतु मुख्यमंत्री परदेश दौऱ्यावर असल्याने सरकारच्या वतीने एखाद्या वरीष्ठ मंत्र्यांनी भेटावे विंâवा मुख्यमंत्र्यांसोबत संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाच्या भेटीची निश्चित तारीख देण्यात यावी अशी मागणी आंदोलकांनी केली. परंतु ना सरकारच्या वतीने कोणी पीडितांना भेटावयास आले, ना भेटीची तारीखही देण्यात आली. अखेर पीडित कुटुंबियांच्या सह्यांसह मागण्यांचे निवेदन संघर्ष समितीच्या वतीने मुख्यमंत्री तसेच महसूल मंत्र्यांच्या कार्यालयात सादर करण्यात आले.




**अंजली यांनी आपले पती माया हरिजन यांना या दुर्घटनेत गमावले. ते नालेसफाईचे काम करायचे. अंजली यांनी सांगितले, "जेव्हापासून ते नालेसफाईचे काम करायला लागले तेव्हापासून ते दारू प्यायला लागले. दुर्घटनेच्या दिवशी तेसुद्धा प्याले होते, परंतु त्यांची प्रकृती चांगली होती व ते बाहेर लक्ष्मीनगरच्या चौकात बसले होते. सकाळी १० वाजता तिथे आलेल्या पोलिसांनी, त्यांनीसुद्धा दारू घेतली आहे का याबद्दल त्यांना विचारले असता त्यांनी हो म्हणून सांगितले. त्यानंतर त्यांना पोलिस अन्य ७ जणांसह शताब्दी इस्पितळात घेऊन गेले जेथे त्यांना दोन इंजेक्शन देण्यात आली. संध्याकाळी ४ वाजेपर्यंत त्यांची प्रकृती ठीक होती. त्यानंतर शताब्दी इस्पितळातील डॉक्टरनी सांगितले की त्यांना नायर इस्पितळात हलविण्यात यावे कारण तेथे चांगली मशीन्स आहेत. नायर इस्पितळात जाईपर्यंत रात्रीचे ९ वाजले होते. तेथे डॉक्टरनी फक्त ग्लुकोजच्या दोन बाटल्या लावल्या व त्यानंतर त्यांचा श्वासोच्छ्वास वाढला व उलट्या होऊ लागल्या. त्यानंतर ते त्यांना आयसीयूमध्ये घेऊन गेले, व तिथे गेल्यावर त्यांचा मृत्यू झाला. माझ्या नवऱ्याला तसेच त्याच्यासारख्या इतर अनेकांना चांगले उपचार मिळाले असते तर त्यांचे जीव वाचू शकले असते परंतु शताब्दी इस्पितळातील डॉक्टरनी अजिबात प्रयत्न केले नाहीत."**

## मालवणी दारूकांडाच्या निषेधार्थ दिल्लीतही महाराष्ट्र भवनसमोर निदर्शन

दि. ७ जुलै रोजी नौजवान भारत सभेने मुंबईत १७ जूनला झालेल्या मालवणी दारूकांडाच्या निषेधार्थ दिल्लीतील महाराष्ट्र भवनसमोर निदर्शन केले. नौजवान भारत सभातर्फे बोलताना सनी यांनी सांगितले की सरकारच्या अनास्थेचा जोरदार निषेध झाला पाहिजे. मृतांच्या कुटुंबियांना मदत देणे टाळण्यासाठी सरकार मृतांचा आकडादेखील चुकीचा सांगत आहे, मुंबईत झालेल्या निषेधानंतर सरकारने जाहीर केलेली प्रत्येकी १ लाख रुपयांची मदत लोकांपर्यंत पोहोचविण्यातही सरकार दिरंगाई करीत आहे व पीडितांचे बँक खाते नसल्याचे कारण देत टाळाटाळ करीत आहे. त्याचबरोबर बेकायदेशीर दारूचा व्यापार करणाऱ्यांनासुद्धा पाठीशी घालण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे. बिगुल मजदूर दस्ताच्या वतीने बोलताना गजेंद्र यांनी सांगितले की फडणवीस सरकारने या प्रकरणात लक्ष घालून लवकरात लवकर कारवाई केली पाहिजे. मृतांपैकी बहुतेक जण मजुरी करणारे, लहानसहान व्यवसाय करणारे व दुर्बल आर्थिक पाश्र्वभूमी असणारे आहेत, म्हणूनच ना मीडिया या घटनेची भीषणता योग्य प्रकारे लोकांपर्यंत पोहोचवीत आहे, ना सरकार संवेदनशील दिसत आहे. सरकारची असंवेदनशीलता सरकारमधील घटक पक्ष असलेल्या रीपब्लिकन पार्टीद्वारे पीडितांना साखर व पीठाच्या केलेल्या वाटपाच्या तमाशावरून दिसून येत आहे. सरकारवर योग्य मदत देण्याबाबत दबाव निर्माण करण्याऐवजी आरपीआय (ए) प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा प्रकार करीत आहेत. नौजवान भारत सभातर्फे आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले ज्यामध्ये या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी व्यक्तींना कडक शिक्षा करण्याची तसेच पीडितांना किमान दहा लाख रुपये नुकसान भरपाई देण्याच्या मागणीचा समावेश आहे.




## कामगारांवरती कंत्राटदाराच्या गुंडांकडून अमानुष गोळीबार....

पान ७ वरून

पोलिस आणि जिल्हा प्रशासन तेथे हत्यारबंद गुंडांची उपस्थिती फेटाळून लावत होते, परंतु त्याच ठिकाणी नंतर झडतीच्या वेळी मोठ्या संख्येने शस्त्रे प्राप्त झाली. यावरून हे स्पष्ट होते की पोलिस, प्रशासन आणि सरकारला तेथे हत्यारबंद गुंड होते याची कल्पना होती, परंतु सर्व काही माहीत असूनही त्यांनी याच्याविरोधात कोणतीही कारवाई केली नाही. फक्त लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करण्यासाठी दोषींवर कडक कारवाई करण्याची तसेच कामगारांचे थकलेले वेतन व ईपीएफ देण्याची घोषणा तेवढी केली. मात्र या घटनेसाठी जबाबदार असलेल्या ठेकेदारावर ना आताप्र्यंत काही कारवाई झालेली आहे, ना कामगारांना त्यांच्या कष्टाचा मोबदला मिळालेला आहे. यावरून हे उघड होते की सरकार आता या प्रकरणातील मुख्य आरोपी ठेकेदार आणि कामगारांवर गोळ्या चालविणाऱ्या अपराध्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

वास्तविक गेल्या काही काळापासून हिमाचल प्रदेशमधील कष्टकरी जनता येथे सुरू असलेल्या वेगवेगळ्या परियोजना तसेच अव्यवस्थित निर्माण कार्यांच्या विरोधात रस्त्यावर उतरते आहे. याचे एक उदाहरण आपल्याला काहीच दिवसांपूर्वी किन्नौर येथे पाहावयास मिळाले जेथे जेपी कंपनीच्या विरोधात स्थानिक जनता व कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी जवळपास दोन महिने दीर्घ संघर्ष केला. कामगार तसेच सामान्य जनतेचा आवाज दडपून टाकण्यासाठी एकीकडे कायदा सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली सरकारने गणवेशधारी गुंडांची फौज बसवलेली आहे, तर दुसरीकडे कंपनी तसेच ठेकेदारांना हत्यारबंद गार्ड ठेवण्याची सूट दिलेली आहे. नेहमीप्रमाणे यावेळीसुद्धा सरकारने कमांद आईआईटी परिसरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली मोठ्या संख्येने पोलिस तसेच अर्धसैनिक दल तैनात करण्याची घोषणा केलेली आहे. सरकारच्या उचललेल्या या पाउलाचा खरा उद्देश्य कामगारांना आपल्या मागण्यांसाठी एकजूट होण्यापासून रोखणे हा आहे, जेणेकरून भविष्यात होऊ घातलेल्या कोणत्याही कामगार आंदोलनास सहज चिरडून टाकता येईल. गेल्या काही वर्षांत देशभरात कामगार आपल्या मूलभूत अधिकारांसाठी पुन्हापुन्हा आवाज उठवत आहेत व हिमाचलसुद्धा याला अपवाद नाही. परंतु ही सर्व आंदोलने योग्या क्रांतिकारी दिशेच्या अभावामुळे आपल्या तार्विâक परिणतीपर्यंत पोहोचू शकलेली नाहीत. मित्रहो, या सर्वच घटनांनी हे सिद्ध केले आहे की सरकार (मग ते कोणत्याही पक्षाचे असो) ने कामगारांच्या प्रतिरोधाचा प्रत्येक आवाज दाबून टाकण्याची पुरेपूर तयारी केलेली आहे. म्हणूनच जर आपल्याला आपले अधिकार मिळवायचे असतील तर आपण आपल्या राहण्याच्या ठिकाणी तसेच कामाच्या ठिकाणी स्वतःच्या क्रांतिकारी संघटना उभाराव्या लागतील, कारण तेव्हाच आपण सरकार, पोलिस आणि भांडवलदारांच्या या भागीदारीचा सामना करु शकू.

**•मनन**

**अनुवाद : अभिजीत**

# ओरियंट क्राफ्ट मधील घटना - गुरगाव मधील कामगारांमध्ये खदखदत असलेल्या जबरदस्त असंतोषाचे आणखी एक उदाहरण

गुरगाव सेक्टर ३४ मधील हिरो-होंडा चौकाजवळील ओरियंट क्राफ्ट कंपनी मध्ये २० जून रोजी पुन्हा एकदा कामगारांचा असंतोष उफाळून आला आहे. सकाळी काम करत असताना विजेच्या धक्क्याने एक कामगार जबर जखमी झाला. कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाला जखमी कामगाराला हॉस्पिटल मध्ये नेण्याची विनंती केली परतू व्यवस्थापनाने त्यास नकार दिला. त्यानंतर कामगारांनी स्वतःच त्यांच्या जखमी सहकाऱ्याला हॉस्पिटल मध्ये भारती केले. काही वेळानंतर त्या कामगाराचा मृत्यू झाल्याची अफवा पसरली. त्या पश्चात कामगारांमधील संताप उफाळून आला आणि त्यांनी कारखान्यामध्ये तोडफोड करण्यास सुरुवात केली. त्यांनी कंपनीच्या काही भागाला आणि अधिकाऱ्यांच्या गाड्यांना आगीच्या स्वाधीन केले आणि अधिकाऱ्यांना मारहाण सुद्धा केली. लावण्यात आलेली आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाच्या १२ गाड्या बोलावण्यात आल्या. त्यानंतर साधारण ४०० पोलिसांच्या तुकडीला तिथे पाचारण करण्यात आले. त्यांनी जबरदस्त लाठीहल्ला चढवून कामगारांना तिथून बाहेर काढले.

रेडीमेड गारमेंट बनवणाऱ्या ह्या फैक्ट्री मध्ये घडलेली अश्या प्रकारची ही पहिली घटना नाही. ह्या अगोदर सुद्धा दुर्घटनेमध्ये जखमी झालेल्या कामगाराला उपचार न पुरवणे, कंत्राटदारांची मनमानी या विरोधात कामगारांनी त्यांच्या असंतोषाचे उग्र प्रदर्शन केलेले आहे. ह्या घटनेतून पुनश्च एकदा हे सिद्ध झाले आहे की गुरगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये कारखान्यांमध्ये कामगारांच्या अमानुष शोषणाच्या विरोधात कामगारांमध्ये प्रचंड असंतोष खदखदत आहे. नेतृत्वाचा अभाव व आपल्या न्याय्य मागण्याच्या पूर्ततेसाठी संघटीत होऊन संघर्ष न करू शकण्याचा परिणाम हा होतो की कामगारांचा असंतोष अश्या प्रकारच्या घटनांमधून अराजक पद्धतीने रस्त्यावर व्यक्त होतो. अश्या पद्धतीचे अराजक संघर्ष गुंड आणि पोलिसांच्या बळावर मोडून काढण्यात येतात. त्यानंतर बहुतेक कामगार दुसऱ्या ठिकाणी काम शोधतात किंवा न्यायाच्या अपेक्षेने न्यायालयांचे उंबरठे झिजवतात.

आज कामगारांमधील असंतोष ज्या पद्धतीने रस्त्यांवर व्यक्त होत आहे त्यावरून हे अगदी स्पष्ट आहे की गुरगाव क्षेत्रामध्ये कामगारांमध्ये त्यांच्या स्थितीबद्दल प्रचंड असंतोष व्याप्त आहे. ह्या असंतोषाला एक दिशा देण्याची गरज आहे आणि त्याच्या शक्यता सुद्धा प्रचंड आहेत. गुरगाव मध्ये जवळपास १०,००० कारखाने आहेत. ह्या कारखान्यांमध्ये सबंध वर्षभर स्थायी काम चालते,पण तरी सुद्धा तिथे काम करणारे बहुतांश कामगार हे कंत्राटी कामगार म्हणून काम करतात. ह्या १०,००० कारखान्यांपैकी केवळ १०० कारखान्यांमध्येच कामगार आपल्या ट्रेड युनियन्स स्थापन करू शकले आहेत, ह्या वरून चित्र स्पष व्हावे. बहुतांशी ठिकाणी जेव्हा कामगार युनियन बनवण्याची मागणी करतात तेव्हा त्यातील नेतृत्वकारी कामगारांवर हल्ले घडवले जातात किंवा त्यांना कामावरून कमी केले जाते. हे सगळे प्रकार मालक-कंत्राटदार आणि श्रम विभागाच्या संगनमताने होतात.



कित्येक कारखान्यांमधील कामगारांशी अनौपचारिकरीत्या बोलताना कळते की कश्या प्रकारे कामगारांकडून जबरदस्तीने ज्यादा वेळ काम करवून घेण्यात येते, आणि जेव्हा एखादा कामगार ज्यादा तास काम करण्यास नकार देतो तेव्हा कसे मालकाचे गुंड त्याला धमक्या देतात आणि बऱ्याच वेळा कामाचे पैसे न देताच कामावरून काढून टाकण्यात येते, जेणे करून कामगारांमध्ये दहशत कायम राहावी. शिवीगाळ तर रोजचाच आहे. कामगारांनी सांगितले की कधी कधी त्यांचा पगार सुद्धा वेळेवर दिला जात नाही आणि ६ दिवसांपासून अगदी एक-एक महिना सुद्धा त्यांचा पगार रोखून धरण्यात येतो. असेच काहीसे ह्याच ओरियंट क्राफ्ट कंपनी मध्ये दोन वर्षापूर्वी घडले होते, जेव्हा कामावर न आल्यामुळे चिडलेल्या कंत्राटदाराने कामगारांना शिवीगाळ केला आणि एका कामगाराच्या पोटात कात्री घुसवून त्याला गंभीर जखमी केले होते. ह्या घटनेनंतर कामगारांमध्ये खदखदणारा असंतोष उग्र रुपात व्यक्त झाला होता आणि त्यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांची तोडफोड सुरु केली होती. त्यावेळी सुद्धा प्रचंड पोलिस बळाच्या जोरावर कामगारांच्या विरोध नियंत्रणात आणण्यात आला होता. ह्या अगोदर सुद्धा उद्योग-विहार परिसरातील कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांनी कामाच्या अमानवीय परिस्थितीच्या विरोधात आवाज उठवण्याचे प्रयत्न केले होते, परंतु मालक व पोलिसांचे संगनमत आणि योग्य नेतृत्वाचा अभाव ह्यांमुळे त्यांचा संघर्ष आंदोलनाचे रूप घेऊ शकला नाही.

प्रत्येक दिवस कुठल्या ना कुठल्या कारखान्यामध्ये दुर्घटना होतच असतात. पण कुठल्याच कारखान्यामध्ये ना उपचाराची व्यवस्था असते, ना जखमींना बाहेरून उपचार करण्यास मदत केली जाते. बहुतेकदा जखमी कामगारांना उपचार घेण्यासाठी सुट्टी सुद्धा देण्यात येत नाही आणि सरळ कामावरून काढून टाकण्यात येते. कित्येक वेळा कामावरील दुर्घटनेमध्ये कामगाराचा मृत्यू झाला तरी त्याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई सुद्धा मिळत नाही. आपले होणारे अमानवीय शोषण, कामाचा जबरदस्त दबाव आणि प्रत्येक दिवस जोखीम घेऊन काम करण्यामुळे कामगारांच्या मनात प्रचंड तणाव आणि असंतोष भरला आहे. कुठलेही संघटीत आणि झुंजार कामगार आंदोलन नसल्या कारणाने त्यांचा संताप अश्या अराजक विस्फोटातून अधून-मधून बाहेर पडतो, जो पोलिस-प्रशासन-मालक अगदी सहज दाबून टाकतात.

मागील काही काळापासून गुरगाव मधील वेगवेगळ्या कारखान्यांमध्ये फुटलेल्या कामगारांच्या संतापाकडे बघून अगदी सहज हा अनुमान बांधला जाऊ शकतो की ह्या औद्योग क्षेत्रामध्ये काम करणारी कामगार जनता प्रचंड शोषणाची बळी पडली आहे. केवळ कंत्राटी कामगाराच ह्या शोषणाचे बळी आहेत असे नाही तर कित्येक कारखान्यांमध्ये स्थायी नोकरी करणाऱ्या कामगारांची स्थिती सुद्धा खूप चांगली नाही. मारुति, पावरट्रेन, हीरो होंडा, मुंजाल शोवा इत्यादी कंपन्या ह्याचे ज्वलंत उदाहरण आहेत. परंतु नेतृत्व आणि क्रांतिकारी विकल्पाच्या अभावी शोषित आणि उत्पिडीत कामगार जनतेचा संताप अराजक पद्धतीने रस्त्यांवर व्यक्त होतो. त्यानंतर पोलिस आणि व्यवस्थापनाचे दमन चक्र वेगाने फिरते ज्याचा सामना विखुरलेले कामगार करू शकत नाहीत. आणि पर्यायाने काही काळानंतर हा असंतोष थंड पडतो.

एटक, सीटू, एचएमएस सारख्या मोठ-मोठ्या केंद्रीय युनियन्स गुरगाव मध्ये उपस्थित आहेत. पण अश्या घटना घडतात तेव्हा ह्यांचे दलाल नेते गायब असतात. ओरियंट क्राफ्ट मधील कामगारांसारख्या लाखो असंघटीत कामगारांचे प्रश्न ह्या दलाल कामगार संघटना उठवत सुद्धा नाहीत आणि न त्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न करतात. अधून मधून घडणाऱ्या अश्या घटनांवर खुश होऊन टाळ्या वाजवण्यापेक्षा गरज आहे ती ह्या असंघटीत क्षेत्रातील ह्या प्रचंड मोठ्या कामगार जनतेमध्ये क्रांतिकारी प्रचार-प्रसार करून त्यांच्या मूलभूत मागण्या उदाहरणार्थ - कामाचे ठराविक तास, जबरदस्तीने करवून घेण्यात येणारे कामाचे जास्तीचे तास बंद करणे, व्यवस्थापनाची गुंडगिरी थांबवणे, ट्रेड युनियन अधिकार इत्यादींवर कामगारांना संघटीत करण्याचे प्रयत्न करण्याची आणि सुधारवादी, अर्थवादी आणि धंदेबाज ट्रेड युनियन्सचा खरा चेहरा कामगारांना दाखवून देण्याची आणि त्यांच्या मध्ये व्याप्त असंतोषाला एक योग्य क्रांतिकारी दिशा देण्याची सुरुवात करण्याची!

**•बिगुल वार्ताहर**

# भांडवलाच्या गुलामी पासून मुक्ततेसाठी बॉलीवूड चित्रपटांची नव्हे तर कामगारांच्या संघर्षाच्या गौरवशाली इतिहासाची माहिती असणे गरजेचे आहे!

तसे तर बहुतांश कारखान्यांमध्ये साप्ताहिक सुट्टी नसतेच आणि सातही दिवस काम ही एक सामान्य बाब बनली आहे. पण जेव्हा केव्हा आपल्याला मोकळा वेळ मिळतो तेव्हा आपल्यापैकी बरेच लोक सलमान खान, आमिर खान, शाहरुख खान किंवा बॉलीवूड ताऱ्यांचे चित्रपट बघणे पसंत करतोत. हे चित्रपट बघितल्या नंतर आपण काही काळ का होईना आपण आपले खडतर आयुष्य विसरून जातो. पण त्यामुळे आपल्या वास्तविक जीवनात काहीही फरक पडत नाही. सकाळ झाल्यानंतर आपण पुन्हा एकदा घाण्यावर काम करणाऱ्या बैलासारखे १६-१७ तास राबत मालकांच्या तिजोऱ्या भरण्यासाठी आपापल्या कारखान्यांकडे रवाना होतोत.

बहुतेक चित्रपटांमध्ये नायकाला सामान्य कष्टकरी जनतेचा सहानुभूतीदार व श्रीमंताचा शत्रूच्या रुपात दाखवतात. पण हे सर्व लोक कष्टकरी जनतेबद्दल काय मत ठेवतात ह्याचा दाखला नुकताच मुंबई मधील एका न्यायालयाने सलमान खानला शिक्षा सुनावल्यानंतर ह्यांच्या प्रतिक्रियांमधून मिळू शकतो. यांच्यापैकी काहींनी तर हे सुद्धा म्हटले की फूटपाथ झोपण्यासाठी नसतात, त्यामुळे ह्या घटनेसाठी खऱ्या अर्थाने जबाबदार सलमान खान नसून त्या रात्री फुटपाथवर झोपलेले लोकच आहेत. न्यायालयाने सलमान खानला २००३ मध्ये फुटपाथवर झोपलेल्या माणसांवर दारूच्या नशेत गाडी चढवण्याच्या गुन्ह्यामध्ये, ज्यात एका माणसाचा मृत्यू झाला होता व ४ लोक गंभीर जखमी झाले होते, ५ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. तरीही सर्व कायदे धाब्यावर बसवून त्याला २ दिवसांमध्येच जामीन सुद्धा मिळाला आहे.

शिक्षा जाहीर झाल्यानंतर सर्व बॉलीवूड सलमानच्या बचावासाठी व समर्थनार्थ पुढे आले. त्यापैकी प्रत्येक जण सलमान निर्दोष असून त्याचे मन खूप निर्मळ असल्याचे सांगत होता. परंतु ह्या सर्व तामाश्यामध्ये ह्या अपघातामध्ये बळी गेलेल्या माणसाला न्याय मिळण्याचा संपूर्ण मुद्दाच निकालात काढण्यात आला. ह्यातून हे सिद्ध होते की आपल्या देशात कायदे हे फक्त कामगार व गरिबांवर लागू होतात. त्यामुळेच एकीकडे सलमान खान सारखे लोक गुन्हा करून सुद्धा तुरुंगाबाहेर राहतात आणि दुसरीकडे आपल्या न्याय मागण्यासाठी प्रदर्शन करणाऱ्या कामगारांना कुठल्याही पुराव्याशिवाय तुरुंगात खितपत ठेवले जाते. खरी गोष्ट ही आहे की ह्या चित्रपट सृष्टीमधील नायाकांमध्ये व कारखाना मालकांमध्ये काडीचाही फरक नाही. ज्या प्रमाणे कारखान्यामध्ये सर्व मेहनत कामगार करतो आणि नफा मालक हडप करतो, त्याच प्रमाणे एक चित्रपट बनवण्यामध्ये शेकडो कष्टकऱ्यांची मेहनत लागलेली असते पण श्रेय, नफा केवळ नि केवळ निर्माता, दिग्दर्शक, नायक-नायिका परस्परांमध्ये वाटून घेतात. ह्या व्यतिरिक्त, आपले आलिशान बंगले, महागडे कपडे तसेच आलिशान गाड्यांचा रुबाब दाखवत असताना हे लोक विसरून जातात की ह्या सर्व गोष्टींच्या मागे कित्येक कष्टकऱ्यांची मेहनत लपलेली आहे. पण मित्रांनो, ह्या सर्व परिस्थितीबद्दल आपण सुद्धा तेवढेच जबाबदार आहोत, कारण आपणच आपल्या कष्टाच्या पैश्यांनी ह्यांच्या टुकार चित्रपटाचे तिकीट, सीडी विकत घेतोत. प्रत्यक्षात आपले खरे नायक हे नसून अमरीकेतील शिकागोमध्ये प्राणार्पण केलेले कामगार नेते आहेत, ज्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी स्वतःच्या प्राणांचे बलिदान केले, ज्यांच्या बलिदानाची आठवण म्हणून दरवर्षी १ मे 'कामगार दिन' म्हणून साजरा केला जातो. मित्रांनो, जर आपण आपल्या येणाऱ्या पिढ्यांना ह्या दमघोटू वातावरणातून मुक्त करून त्यांना मोकळ्या हवेत श्वास घेऊ देऊ इच्छित असू तर आपल्याला आपला गौरवशाली इतिहास जाणून घ्यावा लागेल. त्यासाठी गरजेचे आहे की आपण आपला रिकामा वेळ ह्या लोकांचे फालतू चित्रपट बघण्यात वाया घालवण्यापेक्षा अशी पुस्तके किंवा साहित्य वाचण्यात घालावा जी आपल्याला आपल्या अधिकारांबद्दल जागरूक करण्यास मदत करतील.

**•मनन**

# 'कामगार बिगुल' आपल्यामध्ये कशासाठी?

पान १ वरून

कष्टकरी जनतेला शोषण, बेरोजगारी, भूक, महागाई, गरिबी, असुरक्षा, पर्यावरणाची हानी आणि युद्ध ह्या शिवाय दुसरे काही देऊ शकत नाहीये.

**हे संकट काय आहे, हे थोडक्यात समजून घेणं आपल्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.** भांडवली व्यवस्था एक नफेखोर व्यवस्था आहे. ह्या व्यवस्थेमध्ये सर्व वस्तूंचे उत्पादन आणि त्यांचे वितरण लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी न होता मुठभर भांडवलदारांच्या फायद्यासाठी केले जाते. ह्या नफ्यात वाढ व्हावी म्हणून भांडवलदार एकमेकांशी आंधळ्या प्रतिस्पर्धेत गुंतलेले असतात. नफ्यासाठी ते उत्पादन मूल्य (वस्तू तयार करण्यासाठीचा खर्च) कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न करतात. हे उत्पादन मूल्य कमी करण्यासाठी त्यांना कामाचा मोबदला कमी करणे आणि आधुनिक मशिन्सच्या साह्याने मोठ्या प्रमाणात वस्तूंचे उत्पादन करणे आवश्यक असते. त्यामुळे उत्पादन प्रक्रिया अधिकाधिक व्यापक आणि मोठ्या प्रमाणात व्हायला लागते, म्हणजेच, उत्पादन प्रक्रियेचे अधिकाधिक सामाजिकीकरण होत जाते. एखादी वस्तू संपूर्णपणे मी बनवली आहे असा दावा आज कोणताही कामगार करू शकणार नाही. प्रत्येक वस्तूच्या उत्पादनामध्ये हजारो कामगार गुंतलेले असतात. त्यामुळे एकीकडे उत्पादन प्रक्रिया अधिकाधिक सामाजिक होत जाते, परंतु दुसरीकडे ह्या उत्पादन प्रक्रियेची मालकी खाजगी हातांमध्ये असते. साहजिकच आपल्याला नफा मिळेल असा किमतीलाच भांडवलदार उत्पादन केलेला माल विकतात. परंतु ह्या वस्तू खरेदी करण्यासाठी समाजामध्ये खरेदीदारच शिल्लक नसतात, कारण भांडवलदारांनी कामगारांचा कामाचा मोबदला कमी केलेला असतो. त्यांचे इतके शोषण केलेले असते की त्यांची क्रयशक्ती (वस्तू विकत घेण्याची ऐपत) कमी कमी होत जाते आणि ते जगण्यासाठीच्या किमान वस्तूसुद्धा खरेदी करू शकत नाहीत. **ह्याचा परिणाम हा होतो की एकीकडे बाजारपेठांमध्ये वस्तूंचा ढीग लागतो आणि दुसरीकडे त्या वस्तू खरेदी न करू शकणारी गरीब व दरिद्री लोकांची संख्या वाढत जाते. हे वस्तूंचे 'अति-उत्पादन'च भांडवली संकटाचे मूळ कारण आहे.** भांडवली व्यवस्थेच्या ह्या संकटावर कुठलाही उपाय नाही कारण ह्या व्यवस्थेमध्ये उत्पादन लोकांच्या गरज पूर्ण करण्यासाठी न होता मालकांच्या नफ्यासाठी होते. हे संकट भांडवली व्यवस्था नष्ट करूनच संपवता येऊ शकते आणि तेव्हाच कामगार वर्गाला बेरोजगारी, गरिबी, नोकरीतील अनिश्चितता, भूक यांसारख्या दैत्यांपासून मुक्ती मिळू शकते. **त्यामुळेच "ह्या नफेखोर व्यवस्थेचा पर्याय कसा निर्माण केला जावा?" हा आज आपण कामगारांसमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे. एका चांगल्या आणि समतामूलक समाजाची निर्मिती कशी केली जावी? कामगार वर्गाच्या सत्तेची स्थापना कश्या प्रकारे केली जाऊ शकते? त्यासाठीची सुरुवात कुठून केली जाऊ शकते?**

जगभरात आर्थिक संकटाचे ओझे कष्टकरी, कामगारांवर टाकण्यात येत आहे. अफाट नफ्याची हाव, सट्टेबाजी आदी कारणांमुळे दिवाळखोरीत निघणाऱ्या जगभरातील बँका व कंपन्यांना तिथली सरकारे जनतेने रक्त आटवून, घाम गाळून निर्माण केलेल्या संपत्ती द्वारे वाचवत आहेत. त्यासाठी जगभरातील सरकारे सातत्याने जनतेच्या सार्वजनिक सुविधांमध्ये कपात करून त्याबदल्यात भांडवलदारांना सबसिडी, बेल-आउट पॅकेजेस आणि नगण्य व्याज दराने प्रचंड मोठी कर्जे वाटत आहेत. त्याच बरोबर, मंदीचे कारण देऊन सगळीकडे कामगार कपात आणि कारखाने बंद करण्यात येत आहेत. नवीन रोजगार निर्माण होणे दूरच, पण आहेत ते रोजगार सुद्धा कमी केले जात आहेत. जे थोडे फार रोजगार निर्माण होत आहेत त्यातही कंत्राटी पद्धत, रोजंदारी पद्धत जोर धरत आहे. वाढत्या बेरोजगारीमुळे हाताला काम असलेल्या कामगारांची हक्कांसाठी घासाघीस करण्याची ताकत कमी होत चालली आहे आणि त्यांना बहुतेक वेळा गुलामासारखे राबवले जात आहे. **अंबानी-अदानीच्या मालकीची वृत्तपत्रे, वाहिन्या काहीही सांगोत, सत्य परिस्थिती काय आहे ते आपण कामगारच जाणतो!**

ह्याचा अर्थ असा नाही की देशभरातील कामगार, कष्टकरी आपल्या दिवसेंदिवस बिघडणाऱ्या परिस्थितीवर गप्प बसून आहेत. मारुती सुझुकी, बजाज, ह्युंडाई, होंडा, टोयोटा सारख्या प्रचंड मोठ्या कार उत्पादक कंपन्यांमधील कामगारांपासून दिल्लीमधील पोलाद कारखान्यांमधील कामगार, लुधियाना मधील कपड्यांच्या कारखान्यांमधील कामगार, तीरपूर-यमन मधील कामगार, हरियानातील कंत्राटी शिक्षक आणि त्याच बरोबर देशभरातील असंघटित क्षेत्रातील कामगार आपल्या हक्कांसाठी लढत आहेत. ते रस्त्यावर उतरले आहेत. संप करत आहेत, आंदोलनं करत आहेत. महाराष्ट्रामध्ये सुद्धा वेळोवेळी कामगारांमध्ये खदखदत असलेला असंतोष विविध मार्गानी बाहेर पडत आहे. **परंतु आपल्या देशातील आणि जगभरातील कामगार चळवळीमध्ये अश्या प्रकारची स्वतःस्फूर्त (आपोआप निर्माण होणारी) आंदोलनं आणि संघर्ष वेळोवेळी झालेले आहेत.** मागच्या दहा वर्षांच्या काळातच इजिप्त, ट्युनिशिया, ग्रीस, स्पेन इत्यादी देशांमध्ये झालेली जबरदस्त आंदोलनं ह्याचा पुरावा आहेत. परंतु असे स्वतःस्फूर्त कामगार विद्रोह आणि आंदोलने कोणत्याही क्रांतिकारी विचारधारेच्या आणि संघटनेच्या अभावी सध्याच्या नफेखोर व्यवस्थेला पर्याय निर्माण करू शकलेले नाहीत. इजिप्त मागील काही वर्षांमध्ये कित्येक वेळा क्रांतीच्या उंबरठ्यावर पोहोचला परंतु कामगार वर्गाचे नेतृत्व करणाऱ्या क्रांतिकारी पक्षाच्या अभावी प्रत्येक वेळी ही संधी हातातून निघून गेली. 'ग्रीस'मध्ये सुद्धा राजकीय संकट क्रांतिकारी परिस्थिती निर्माण करण्याच्या मार्गावर होते, परंतु 'सिरीजा' नावाच्या लोकानुनय करणाऱ्या संधीसाधू डाव्या पक्षाने ही प्रक्रिया मध्येच खंडित केली. ही सगळी उदाहरणे काय दाखवत आहेत? ही उदाहरणे दाखवून देत आहेत की जगभरातील कामगार, कष्टकरी जनता भांडवलशाहीच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरत आहे, परंतु अशी आंदोलनं, विद्रोह आपोआप क्रांती करू शकत नाहीत. त्यासाठी आवश्यकता आहे ती क्रांतिकारी विचारधारेची आणि क्रांतिकारी पार्टीची! ह्या दोन घटकांशिवाय कुठलाही जनविद्रोह फारफार तर एका भांडवली सरकारच्या जागी दुसरे भांडवली सरकार बसवू शकतो, पण तो कुठलेही व्यवस्था परिवर्तन करू शकत नाही! **म्हणजेच असे विद्रोह फारफार तर सरकार बदलवू शकतात, पण कुठलेही व्यवस्था परिवर्तन करू शकत नाहीत!**

## कामगार चळवळ एकजूट करून तिला क्रांतिकारी दिशा देण्याची आवश्यकता

हे खरं आहे की ह्या जनविद्रोहांमुळे व आंदोलनांमुळे आणि त्याच बरोबर उपायहीन आर्थिक संकटामुळे भांडवलदार वर्गाच्या "समाजवादाचा मृत्यू" किंवा "भांडवलशाहीचा अंतिम विजय" सारख्या मनोरंजक घोषणा आणि त्यातील उन्माद थंड पडला आहे. आज भांडवलदारांचे भाट असलेले लेखणी बहाद्दर बुद्धीजीवी सुद्धा भांडवलशाहीला "इतिहासाचा अंत" म्हणण्याचे धाडस करण्यास धजावत नाहीयेत. ज्यांनी कोणी भांडवलशाहीला "इतिहासाचा अंत" घोषित केले होते, त्यांना स्वतःचे म्हणणे माघारी घेणे भाग पडले आहे. १९९० मध्ये जेव्हा सोविएत संघराज्यातील नकली समाजवादाचे पतन झाले, त्यावेळी भांडवलदारांच्या दलालांनी "कामगार वर्गाच्या विचारधारेचा अंत झाला आहे आणि त्याच बरोबर इतिहासाचा सुद्धा अंत झाला आहे. कारण मानवी समाज विकसित होऊन त्याच्या सर्वोच्च उन्नत अवस्थेत म्हणजेच भांडवलशाही पर्यंत पोहोचला आहे" सारख्या घोषणा दिल्या होत्या. परंतु २००० साल उजाडता उजाडता ह्या भाडोत्री दलालांची तोंडे बंद झाली कारण जागतिक भांडवली व्यवस्था उपायहीन संकटाच्या गर्तेत सापडली होती. **एकीकडे भांडवलशाही ह्या मृतप्राय, पतनशील अवस्थेत होतीच, तर दुसरीकडे जनतेची आंदोलने सुद्धा विखुरलेली, विस्कळीत होती; व ती स्वतःस्फूर्ततावाद, विचारधारात्मक कमकुवतपणा आणि नेतृत्वाचा अभाव ह्यांची बळी पडली आहेत.** परिणामतः, ते असा कुठलाही व्यावहारिक पर्याय निर्माण करू शकत नाहीयेत; ते विसाव्या शतकातील कामगार क्रांत्यांच्या सकारात्मक व नकारात्मक पैलूंबद्दल अनभिज्ञ तरी आहेत किंवा त्याबाबत अत्यंत कमी जाणतात; ही आंदोलने समाजवादाच्या भूतकाळातील प्रयोगांमधून योग्य निष्कर्ष काढून नवीन प्रयोग करण्याची क्षमता आत्मसात करू शकलेली नाहीत; ही आंदोलने एकमेकांबरोबर सहकार्य करत व्यवस्थाविरोधी राजकीय क्रांतिकारी आंदोलन बनण्याच्या दिशेने सुद्धा काही प्रगती करू शकलेली नाहीत. आपल्या देशात सुद्धा कष्टकरी, कामगार आपल्या हलाखीच्या परिस्थिती विरुद्ध संघर्ष करत आहे. **परंतु हे संघर्ष विखुरलेले आणि स्थानिक आहेत.** ह्या संघर्षांचा शत्रू एकच आहे : भांडवलदार वर्ग आणि त्यांची सेवा करणारे सरकार! परंतु ह्या संघर्षांमध्ये कुठलाही ताळमेळ व संबंध नाही. आज गरज ह्या संघर्षांना हे सत्य पटवून देण्याची आहे की आपला सर्वांचा शत्रू समान आहे आणि म्हणून आपला संघर्ष सुद्धा एकत्र व्हायला हवा, एकजूट होऊन व्हायला हवा. परंतु सध्या हे काम पूर्ण करू शकेल अशी कोणतीही राजकीय शक्ती अस्तित्वात नाही. आपल्या ह्या कमकुवतपणामुळेच अत्यंत जीर्ण, सडलेल्या आणि जर्जर अवस्थेत असूनही जागतिक भांडवलशाही टिकून आहे. जोपर्यंत कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व आणि नेतृत्व करणारी क्रांतिकारी पार्टी सर्व देशांमध्ये निर्माण होऊन कामगार आंदोलनामधील विस्कळीतपणा संपवून त्याला एका व्यवस्था विरोधी क्रांतिकारी चळवळीत बदलत नाही आणि जनतेच्या समोर एक व्यावहारिक आणि वैज्ञानिक पर्याय ठेवत नाही तोपर्यंत ही जीर्ण, सडलेली आणि जर्जर भांडवली व्यवस्था स्वतःहून कोसळणार नाही. **त्यामुळे कामगार चळवळीची आजची सर्वात मोठी गरज आहे - एका अखिल भारतीय क्रांतिकारी कम्युनिस्ट पार्टीची निर्मिती! जेव्हा आम्ही कम्युनिस्ट पार्टीबद्दल बोलतो तेव्हा साहजिकच आम्ही संसदीय डावे आणि संशोधनवादी पक्ष यांच्याबद्दल बोलत नसतो. भाकप (सीपीआई), माकप (सीपीआई-एम) वा भाकप (माले) (सीपीआई-एमएल) सारखे संसदीय डावे पक्ष आज कामगार वर्गासाठी सर्वात धोकादायक शत्रूंपैकी एक आहेत. हे पक्ष म्हणजे संसदीय सत्तेची लाल मिर्ची खाऊन विरोधाची पोपटपंची करणारे पोपट आहेत. ह्यांचे खरे काम ह्या व्यवस्थेमध्येच सुधार करून ह्या व्यवस्थेचे संरक्षण करणे हे आहे. ह्या संशोधनवाद्यांनी मार्क्सवादी क्रांतिकारी विचारांमध्ये "संशोधना"च्या नावाखाली त्यातील क्रांतिकारी सार काढून टाकले आहे आणि मार्क्सवादाला एका प्रतिक्रियावादी, कामगार विरोधी सुधारवादामध्ये रुपांतरीत केले आहे. संशोधन वादाचा अर्थच आहे - केवळ नावामध्ये कम्युनिस्ट आणि कृतीमध्ये भांडवली सुधारवाद!** कामगारांना केवळ ह्या पक्षांपासूनच नव्हे तर त्यांच्याशी संबंधित ट्रेड युनियन्स पासून सुद्धा सावध राहीले पाहिजे. केवळ इतकेच नाही तर कुठल्याही निवडणूकबाज पक्षाशी संबंधित कामगार युनियन्स पासून कामगारांना सावध राहीले पाहिजे आणि त्या ऐवजी आपली स्वतःची स्वतंत्र व क्रांतिकारी कामगार चळवळ उभारली पाहिजे.

**तसेच आम्ही जेव्हा क्रांतिकारी कम्युनिस्ट पक्षाच्या आवश्यकतेबद्दल बोलतो त्यावेळी आम्हाला सी. पी. आई.(माओवादी) सारखा अति-साहसवादी डावा पक्ष अभिप्रेत नसतो, जे त्यांच्या असंख्य बलिदानानंतरही भारतीय कम्युनिस्ट आंदोलनाचे नुकसान करत आहेत. त्यांची विचारधारात्मक समज कमी आहे, त्यांचा क्रांतीचा कार्यक्रम चुकीचा आहे आणि ते भयंकर पोथीनिष्ठ बनले आहेत. देशातील सर्वात मोठा वर्ग असलेल्या कामगार वर्गामध्ये ह्यांचे अस्तित्व नगण्य आहे कारण कामगारांमध्ये काम करणे त्यांच्या अजेंड्यावर नाही. ह्यांच्या कडून कामगार वर्गाला भांडवली निवडणूकबाज पक्ष आणि नकली डाव्यांच्या भरोश्यावर सोडून देण्यात आले आहे. म्हणूनच आम्ही आज देशात एका नवीन क्रांतिकारी पक्षाच्याव बांधणीचे कार्य अत्यंत महत्वाचे मानतो, ज्याद्वारे नवीन विचार-केंद्रे, नवीन भरती-केंद्रे आणि नवीन प्रयोग-केंद्रे कार्यान्वित केली जातील. हे काम करण्यासाठी आम्हाला एका कामगारांच्या राजकीय वृत्तपत्राची गरज वाटते.** अगोदरच ह्या कामात खूप उशीर झाला आहे.

**आज कामगार वर्गातील उन्नत राजकीय चेतनेच्या घटकांना संघटित करून, त्याच्या विखुरलेल्या शक्तीला संघटीत करून कामगार वर्गाची क्रांतिकारी पार्टी निर्माण करण्यासाठी कामगार वर्गाच्या राजकीय वृत्तपत्राची गरज आहे, जे वृत्तपत्र कुठल्याही परिस्थितीमध्ये कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार सातत्याने चालू ठेवू शकेल, कामगारांच्या प्रत्येक न्याय्य संघर्षामध्ये भागीदारी करेल, त्या संघर्षांना समर्थन व मार्गदर्शन देऊ शकेल, सर्व संघर्षांना एका सूत्रामध्ये बांधून एकत्र आणू शकेल आणि ह्या सर्व प्रक्रियेमध्ये सर्व कामगार वर्गाला भांडवली व्यवस्थेवर निर्णायक प्रहार करण्यासाठी तयार करू शकेल.**

## कामगार वर्गाचे राजकीय वृत्तपत्र कसे असायला हवे?

कामगार वर्गाची नेतृत्वकारी क्रांतिकारी पार्टी बनवण्यासाठी सर्वात पहिली आणि अनिवार्य गोष्ट आहे ती म्हणजे कामगार वर्गाचे स्वतःचे क्रांतिकारी राजकीय वृत्तपत्र! 'कामगार बिगुल' हीच गरज पूर्ण करण्याच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल आहे. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये सामान्य राजकीय प्रचार आणि ठोस आंदोलनात्मक प्रचार व शिक्षण देऊ करेल. त्याच बरोबर विविध राजकीय, आर्थिक आणि सामाजिक मुद्द्यांवर कामगार वर्गात स्वतंत्र क्रांतिकारी दृष्टीकोन विकसित करण्याचा प्रयत्न करेल. ही जबाबदारी तेच वृत्तपत्र पूर्ण करू शकेल जे अधिकाधिक सातत्याने प्रकाशित होईल, एकाच वेळी अनेक भाषांमध्ये आणि देशव्यापी स्तरावर प्रकाशित होईल. सध्या आम्ही हे वृत्तपत्र दोन भाषांमध्ये - हिंदी व मराठी - प्रकाशित करू शकत आहोत आणि ते सुद्धा महिन्यातून एक वेळ. निश्चितपणे हे पुरेसं नाही. परंतु सध्या आम्ही इथूनच सुरुवात करत आहोत. त्या नंतर आम्ही हे वृत्तपत्र पंधरवड्यात आणि पुढे आठवड्यातून एकदा प्रकाशित करण्याचा प्रयत्न करू.

अशा राजकीय वृत्तपत्राशिवाय अश्या प्रकारचे राजकीय कामगार आंदोलन उभे करणे शक्य नाही, कारण

पान ७ वर

# ‘कामगार बिगुल’ आपल्यामध्ये कशासाठी?

पान ६ वरून

अश्या मुखपत्राच्या माध्यमातूनच राजकीय आंदोलनाच्या मूलभूत गरजा पूर्ण होतात. ह्या राजकीय गरजा पुढील प्रमाणे आहेत. पहिली, कामगार वर्गात खदखदत असलेला असंतोष आणि त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्व घटकांना एकत्र करणे. दुसरे, सर्वहारा वर्गातील राजकीय असंतोषाला एक योग्य क्रांतिकारी राजकीय दिशा देऊन सशक्त बनवणे. तिसरे, वेगवेगळ्या मुद्द्यांवर संघर्ष न करता सर्व भांडवली व्यवस्थेचे खरे स्वरूप जनतेसमोर नागडे करणे; म्हणजेच केवळ आर्थिक प्रश्नांवर संघर्ष न करता राजकीय सत्तेसाठीच्या संघर्षाचा प्रश्न उपस्थित करणे. आज अश्या राजकीय प्रचाराचा आवाज अगदीच क्षीण आहे, पण त्यामुळे फारसा फरक पडत नाही. आपल्याला त्याची काळजी न करता मराठी भाषेत अश्या राजकीय कामगार वृत्तपत्राची सुरुवात करावी लागेल, ज्या मार्फत व्यवस्थेचे घृणास्पद वास्तव उघड करू इच्छिणारे सर्व आवाज व्यक्त होऊ शकतील.

आज देशभरात आणि महाराष्ट्रात कामगार वर्गाचा एक मोठा भाग लिहू-वाचू शकतो, जो अश्या प्रकारच्या राजकीय प्रचाराची गरज अनुभवत आहे, जो आजूबाजूच्या घटनांमागचे कांगोरे जाणून घेऊ इच्छितो, जो संघर्ष करण्यासाठी आणि संघटित होण्यासाठी तयार आहे. आज देशामध्ये ६० कोटी कामगार आहेत, ज्यांच्याकडे त्यांची श्रमशक्ती विकण्याशिवाय उपजीविकेचे दुसरे कुठलेही साधन नाही. जर ह्यात त्या ३०-३५ कोटी शेतकऱ्यांना जोडले ज्यांची उपजीविका मुख्यत्वे शेतीवर अवलंबून नसून मजुरीवर अवलंबून आहे, तर सबंध देशातील सर्वहारा व अर्ध-सर्वहारा वर्गाची एकूण लोकसंख्या ८५-९० कोटी इतकी प्रचंड भरते. ह्यापैकी २५ कोटी सरळ-सरळ औद्योगिक कामगार आहेत; ह्या व्यतिरिक्त, शहरी गरीब कामगार व अर्ध-कामगार ह्यांची लोकसंख्या सुद्धा कोटींमध्ये आहे. शेती मधील मजुरांची संख्या सुद्धा ३५ कोटींच्या घरात आहे. इतक्या प्रचंड लोकसंख्येच्या कामगार वर्गात उन्नत, लिहू-वाचू शकणाऱ्या कामगारांची मोठी संख्या अस्तित्वात आहे, जो आज क्रांतिकारी प्रचार व आंदोलन, शिक्षण-प्रशिक्षणासाठी केवळ तयारच नाही तर त्यांची गरज आहे असे सुद्धा मानतो. महाराष्ट्र तुलनात्मकदृष्ट्या अधिक औद्योगिक विकास झालेले राज्य आहे आणि इथे सुद्धा कामगारांची संख्या कोटींमध्ये आहे. **२०१४ मध्येच महाराष्ट्रातील कार्यशक्ती ५ कोटींच्या घरात पोहोचली होती. देशातील एकूण औद्योगिक रोजगारापैकी १३ टक्के रोजगार महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे उघडच आहे की महाराष्ट्रामध्ये सुद्धा कामगार वर्गामध्ये राजकीय व आंदोलनात्मक प्रचार, शिक्षण-प्रशिक्षणाची गरज आहेच, पण कामगारांचे स्वतःचे असे एकही कामगार वृत्तपत्र नाही.** भांडवलदार वर्ग आणि त्याचे भाट ह्यांच्या पेक्षा वेगळा असा कामगार वर्गाचा स्वतंत्र क्रांतिकारी दृष्टीकोन समाजापुढे ठेऊ शकणाऱ्या एका राजकीय कामगार वृत्तपत्राच्या अभावी हा कामगार वर्ग राजकीय दृष्ट्या विखुरलेला आहे आणि काही प्रमाणात अराजकीय सुद्धा झालेला आहे. त्याला निश्चित दिशा मिळू शकलेली नाही. त्यामुळेच कामगार वर्गाचा एक मोठा भाग भांडवली प्रचाराचा बळी पडला आहे आणि वेळप्रसंगी तो भांडवलदार वर्गाचे शेपूट सुद्धा बनतो. ही स्थिती कामगार वर्गाच्या एका राजकीय वृत्तपत्राच्या माध्यमातूनच बदलता येऊ शकते.

## केवळ प्रचारक नाही तर संघटनकर्ता सुद्धा!

असे राजकीय वृत्तपत्र केवळ आंदोलक व प्रचारकाचे काम करणार नाही तर संघटनकर्त्याचे काम सुद्धा पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगार वर्गाच्या क्रांतिकारी पार्टीच्या निर्माण कार्यामध्ये मध्यवर्ती भूमिका बजावेल ज्याच्या भोवती संपूर्ण पार्टीची बांधणी होईल. त्यासाठी हे वृत्तपत्र स्थानिक घडामोडींमध्ये सहभागी होईल, नियमितपणे सामान्य राजकीय प्रचार करेल, आपल्या वाचकांना राजकीय घडामोडींबद्दल आणि त्यांचा समाजाच्या विविध घटकांवर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी शिक्षित-प्रशिक्षित करेल आणि अशी प्रभावी माध्यमं निर्माण करेल ज्या मार्फत अश्या राजकीय घडामोडींमध्ये हस्तक्षेप करून त्यांना प्रभावित करता येऊ शकेल.

अर्थातच, हे वृत्तपत्र कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणात व नियमित पोहोचण्यासाठी ह्या कामगार वृत्तपत्राचे स्वतःचे एजंट व पक्षधर वितरक यांची आवश्यकता भासेल, जे स्वतः कामगार वर्गातूनच तयार होऊ शकतात. हे वृत्तपत्र नियमित वाचणाऱ्या वाचकांची वाचक मंडळं निर्माण केली जाऊ शकतात, आणि पुढे चालून त्यांना ह्या वृत्तपत्राशी संबंधित समित्यांचे, गटांचे रूप दिले जाऊ शकते. हे गट व समित्या ह्या वृत्तपत्राचे प्रभावक्षेत्र अधिकाधिक व्यापक करण्यासाठी काम करतील आणि कामगार वर्गातील उन्नत घटकांना ह्यासोबत जोडतील. अश्या समित्यांचे एक व्यापक जाळे निर्माण करावे लागेल. केवळ तेव्हाच आपण कामगार वर्गाच्या एका क्रांतिकारी पार्टीच्या निर्मितीच्या दिशेने पुढे जाऊ शकू. ‘बिगुलवादी कामगार समित्यां’च्या अश्या जाळ्याच्या माध्यमातून अशी राजकीय पार्टी निर्माण होऊ शकते. ह्या समित्यांच्या जाळ्यांना राजकीय चेतना, दूरदर्शिता आणि लवचिकता ह्यांनी परिपूर्ण करावे लागेल, जेणे करून ते आशा वा निराशा, गतिशीलता वा साचलेपणा यांसारख्या प्रत्येक परिस्थितीमध्ये धैर्य व संयम ठेऊन सातत्याने काम करत राहतील.

**कामगार वर्गाची आजची लढाई भांडवलशाहीच्या गड-किल्ल्यांवर सरळ हल्ल्यांची लढाई नाही. आज कामगार वर्गाची अशी कोणतीही नेतृत्वकारी संघटनात्मक शक्ती अस्तित्वात नाही, जी विचारधारात्मक स्पष्टता आणि प्रसंगावधान ठेवून आहे; आणि कामगार वर्ग सुद्धा त्यासाठी राजकीय आणि संघटनात्मक दृष्ट्या एकजूट, संघटीत व तयार नाही. आजची तयारी ही भांडवलशाहीच्या गड-किल्ल्यांना घेरण्याची दीर्घ कालीन लढाई आहे. त्यासाठीची सर्वात पहिली गरज आहे ती कामगार वर्गाच्या नेतृत्वकारी क्रांतिकारी पार्टीची! आणि अश्या पार्टी साठी सर्वात पहिली गरज आहे ती कामगार वर्गाच्या स्वतंत्र क्रांतिकारी राजकीय वृत्तपत्राची! कामगार वर्गाला अधिक उन्नत रूपांमध्ये प्रभावित करण्या अगोदर, जोडण्या अगोदर आणि संघटीत करण्या अगोदर त्यांना क्रांतिकारी प्रचाराच्या माध्यमातून प्रभावित करावे लागेल, जोडावे लागेल आणि संघटीत करावे लागेल. ‘कामगार बिगुल’चा उद्देश हे काम पूर्ण करणे हाच आहे. शेवटी आम्ही ह्या वृत्तपत्राचे लक्ष्य आणि स्वरूप काही ठोस बिंदूंमध्ये** *(बॉक्स मध्ये पहा - ‘कामगार बिगुल’चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या)* **तुमच्या पुढे स्पष्ट मांडू इच्छितो आणि तुम्हाला हे आवाहन करू इच्छितो की स्वतःला ह्या वृत्तपत्राशी जोडा, त्याचे नियमित वाचक बना आणि हे वृत्तपत्र अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल यासाठी आपले योगदान द्या.**

### ‘कामगार बिगुल’चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. **‘कामगार बिगुल’ व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

2. **‘कामगार बिगुल’ भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

3. **‘कामगार बिगुल’ स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

4. **‘कामगार बिगुल’ कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षासोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. ‘कामगार बिगुल’ सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

5. **‘कामगार बिगुल’ हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

# आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या कामगारांवरती कंत्राटदाराच्या गुंडांकडून अमानुष गोळीबार

## भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आईआईटी) मंडी, हिमाचल प्रदेश मधील गोळीबारावर एक रिपोर्ट

हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यातील भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या परिसरात गेल्या महिन्यात जून १९ २०१५ रोजी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण पद्धतीने निदर्शने करणाऱ्या कामगारांवर ठेकेदाराच्या गुंडांकरवी गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात एकीकडे १४ कामगार गंभीर जखमी झाले, तर दुसरीकडे निशःस्त्र कामगारांवर गोळ्या चालविणारे ४ बाउंसरसुद्धा मारले गेले. एकूण घटनाक्रम असा. आईआईटी परिसराच्या निर्माण कामातील जवळपास २४२ कामगार ठेकेदाराने वेतन व ईपीएफ न दिल्याने काही दिवसांपासून संपावर होते. कामगारांनुसार, केंद्रीय लोक निर्माण विभागाने ज्या ठेकेदाराला निर्माण कार्याचा ठेका दिलेला आहे, तो कधीच कामगारांना त्यांचा महिन्याचा पगार वेळेवर देत नव्हता. शिवाय, त्याने जानेवारी २०१४ पासून जून २०१५ पर्यंतचा एकंदर १४ लाख रुपयांचा एकूण कामगारांचा ईपीएफसुद्धा भरलेला नव्हता. त्याशिवाय, निर्माण क्षेत्रातील ठेकेदार सर्व कामगार कायद्यांना फाटा देत, कोणत्याही सुरक्षा उपकरणांशिवाय कामगारांकडून सक्तीने १२-१४ तास काम करून घेत होता. याच सगळ्या मागण्यांसाठी कामगार घटनेच्या दोन आठवडे पूर्वीपासून काम बंद करून संपावर गेले होते. कामगारांची सतत वाढत जाणारी एकता मोडून काढण्यासाठी ठेकेदारांनी पंजाबमधून हत्यारबंद बाउंसरना बोलावले होते. येथील लोकांच्या म्हणण्यानुसार हे सगळे गुंड आपल्या शस्त्रांच्या बळावर लोकांना धमकावत होते. कमांदमध्ये वाढत चालेला तणाव आणि आपल्या मागण्यांसाठी कामगारांनी आयुक्तांना भेटून आपले निवेदनसुद्धा सादर केले होते, तसेच प्रशासनाने लवकरात लवकर पाउले उचलली नाहीत तर कोणतीही अप्रिय घटना घडू शकते, याची कल्पनाही दिलेली होती. मात्र कामगारांनी वारंवार इशारा देऊनसुद्धा सरकारने याकडे अजिबात लक्ष दिले नाही. शेवटी १९ जून रोजी कामगार ठेकेदाराची भेट घेण्यासाठी गेले असता तेथे अगोदरच ठेकेदारामार्फत तैनात करण्यात आलेल्या गुंडांनी त्यांना शिवीगाळ केली. कामगारांनी याला विरोध करताच गुंडांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यात १४ कामगार गंभीर जखमी झाले. आपल्या सोबत्यांवर झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यामुळे कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली व त्यांनी गुंडांना घेरले. आपल्या चूक लक्षात येताच ते गुंड सैरावैरा पळू लागले. डोंगराळ रस्त्याची सवय नसल्यामुळे त्यांच्यापैकी दोघे पाय घसरून दरीत कोसळल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. अन्य गुंडांना कामगारांनी घेरून चोप द्यायला सुरुवात केली. यात ते गंभीर जखमी झाले. एवढे सगळे झाल्यानंतर डाराडूर झोपलेल्या सरकारला आणि प्रशासनाला जाग आली व कमांदमध्ये मोठ्या संख्येने पोलिस फोर्स पाठवून स्थिती नियंत्रणात आणण्यात आली. या सर्व तथ्यांवरून हे स्पष्ट होते की कामगारांनी जे काही केले ते स्वसंरक्षणासाठी केले, मात्र तरीही पोलिसांनी कामगारांवर कलम ३०२ अन्वये हत्येची तक्रार दाखल करण्यात आली. याउलट, पोलिसांनी या घटनेतील मुख्य आरोपी असलेल्या ठेकेदाराला तेथून पळ काढण्याची पुरेपूर संधी दिली, तसेच उपचाराचे कारण देत गुंडांना सरकारी सुरक्षेखाली चंदीगढ येथील पीजीआई इस्पितळात दाखल केले, जेथून हे सर्व आरोपी पोलिसांच्या उपस्थितीत दुसऱ्याच दिवशी फरार झाले. या सर्व गुंडांवर पंजाबमध्ये हत्या, लूटमार यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. आणि असे असूनही या गुंडांवर लक्ष ठेवण्यासाठी हिमाचल प्रदेश पोलिस खात्याने फक्त काही कॉन्स्टेबल तैनात केले होते, हे उल्लेखनीय आहे. या एकूण प्रकरणात जी सगळ्यात महत्त्वाची बाब पुढे आले आहे, ती म्हणजे कमांद कॅंपसमध्ये असलेल्या गेस्ट हाऊसमध्ये ठेकेदाराने या सर्व गुंडांना ठेवले होते आणि तेथून पोलिस चौकी फक्त ५० मिटर अंतरावर आहे. अगोदर

पान ४ वर

# ‘माकप’ची २१वी कॉंग्रेस

## संशोधनवादी गटारगंगेत उतरून कामगार वर्गाशी विश्वासघाताची निर्लज्ज कसरत

पश्चिम बंगाल, केरळ विधानसभा आणि मागील लोकसभा निवडणुकांमध्ये तोंडावर पडून अस्तित्वाच्या आणि गंभीर अशा राजकीय-संघटनात्मक संकटातून जात असलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) संक्षेपात – ‘माकप’ची २१वी राष्ट्रीय कॉंग्रेस १४ ते १९ एप्रिल दरम्यान विशाखापट्टनम येथे पार पडली. मार्क्सवादी विज्ञानाच्या आधारे नीती-रणनीतीची पडताळणी करण्याऐवजी आपल्या सवयीच्या अनुभववादी पद्धतीने विश्लेषण करण्याचे कसब अंगी बाणवलेल्या भोळ्या व भावूक मार्क्सवाद्यांनी ह्या कॉंग्रेसकडून खूप जास्त अपेक्षा बाळगली होती. त्यांची अपेक्षा होती की ह्या कॉंग्रेस नंतर ‘माकप’चा वाईट काळ संपेल आणि ‘माकप’ पुन्हा एकदा भारतीय राजकारणातील डाव्या प्रवाहांचे नेतृत्व करणारी शक्ती म्हणून पुढे येईल. पक्षाने स्वतःला ‘लाल’ सिद्ध करण्यासाठी सभास्थान लाल झेंड्यांनी व प्रतीकांनी भरुन टाकले होते. परंतु ह्या कॉंग्रेसमध्ये पारित झालेले प्रस्ताव-रिपोर्ट आणि नवीन नेतृत्वाला जर विचारधारेच्या कसोटीवर तोलले तर लक्षात येते की आयोजन स्थळावरील प्रतीकात्मकता हा केवळ दिखावा होता. वास्तविक पाहता त्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की संशोधनवादाच्या गटार-गंगेत ‘माकप’ अधिकच खोलवर डुबकी घेत आहे आणि कामगार वर्गाशी विश्वासघाताचे अधिकाधिक नग्न प्रदर्शन करत आहे.

ह्या कॉंग्रेसच्या दरम्यान पारित झालेल्या राजकीय-रणकौशलात्मक दिशेबद्दलच्या रिपोर्ट वरून नजर जरी फिरवली तरी लक्षात येते की येणाऱ्या दिवसांमध्ये ‘माकप’ कामगार वर्गाशी विश्वासघाताचे स्वतःचेच जुने विक्रम मोडीस काढण्यास सज्ज झाली आहे. ही रिपोर्ट मागील अडीच दशकांमधील पक्षाच्या राजकीय-रणकौशलात्मक दिशेबद्दल टीकात्मक चिकित्सा करण्याचा दावा करते जेणे करून येणाऱ्या काळासाठी अधिक योग्य राजकीय-रणकौशलात्मक दिशा ठरवता येईल. पण ह्यात आत्म-चिकित्सेच्या ऐवजी केवळ शाब्दिक बुडबुडे फोडण्यात आले आहेत आणि संसदीय गटारगंगेत स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठीचे केविलवाणे प्रयत्न उठून दिसत आहेत. ह्या रिपोर्टच्या बिंदू क्रमांक पाच मध्ये म्हटले आहे की राजकीय-रणकौशलात्मक दिशा ही तात्कालिक धोरण असते जे जनतेची लोकशाही क्रांती करण्याच्या रणनीतिक लक्ष्याच्या पूर्ततेसाठी विशिष्ट परिस्थितीमध्ये स्वीकारावे लागते. ह्याच बिंदू मध्ये पुढे म्हटले आहे की ह्या दिशेच्या माध्यमातून पार्टी बुर्झ्वा-जमीनदारांच्या पक्षांना एक डावा लोकशाही विकल्प देऊन आपल्या रणनीतिक ध्येयाच्या दिशेने पुढे जाऊ इच्छिते. खरे तर ज्या समाजामध्ये कित्येक दशके आधीच भांडवली उत्पादन संबंध स्थापित झालेले आहेत त्यान समाजात जनतेच्या लोकशाही क्रांतीचे रणनीतिक ध्येय तर्काच्या पातळीवर खरे उतरत नाही. पण एकवेळ उत्पादन संबंधांच्या स्वरुपाबद्दलचा विषय बाजूला ठेऊन सुद्धा समीक्षा रिपोर्ट मध्ये जी गोष्ट नमूद केली आहे ती वास्तवाशी मेळ खात नाही. सत्य तर हे आहे की तिच्या जन्मापासूनच ‘माकप’ने बुर्झ्वा निवडणुकांमधील सहभागाचा पर्याय रणकौशल्याच्या रुपात न वापरता रणनीतिक स्वरुपात वापरला आहे, जी कुठल्याही संशोधनवादी पक्षाची खासियत असते. समीक्षा रिपोर्ट मध्ये रणकौशल्याच्या रुपात जे काही लिहिले गेले आहे, ते प्रत्यक्षात ‘माकप’च्या रणनीतीचा भाग आहे. ‘माकप’ सरळ सरळ हे बोलू शकत नाही कारण तसे केले तर तिला स्वतःचा कम्युनिस्ट पक्षाचा बुरखा काढून फेकावा लागेल. त्यामुळेच प्रत्येक संशोधनवादी पक्षाप्रमाणेच ‘माकप’सुद्धा रणनीतीलाच रणकौशल्याच्या रुपात सादर करते.

समीक्षा रिपोर्टच्या बिंदू ६ मध्ये पार्टी स्वतःचीच पाठ थापटून घेत सांगते की कशा प्रकारे १३ वी कॉंग्रेस आणि त्या पश्चातच्या कॉंग्रेस मध्ये पारित झालेल्या राजकीय-रणकौशलात्मक दिशेमुळे पक्षाला राजीव गांधी आणि त्यानंतर नरसिम्हा राव यांचे सरकार पाडण्यात मदत मिळाली. इतकेच नाही तर त्यामुळेच पक्ष १९९६ मध्ये ‘भाजप’ला सत्तेमध्ये येण्यापासून रोखण्यासाठी गैर-कॉंग्रेस पक्षांना एकत्र करू शकला. २००४ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीला सत्तेत येण्यापासून रोखण्यामध्ये ह्या कार्यदिशेने योगदान दिले. त्याच बरोबर कैक जनहिताचे कायदे पारित करून घेण्यामध्ये मदत झाली. ह्या रिपोर्ट मध्ये पक्षाने बुर्झ्वा पक्षांचे सत्तेत येणे वा जाणे ह्या सारखी सामान्य बाब अशा पद्धतीने चित्रित केली आहे की निवडणुकांच्या गटारगंगेत सापाच्या ऐवजी नागाला निवडून दिल्यामुळे जनतेच्या हालापेष्टांमध्ये कमी आली. सर्वहारा वर्गाचा विश्वासघात करणाऱ्यांना हे विचारले पाहिजे की राजीव गांधी ऐवजी व्हि.पी. सिंग, चंद्रशेखर यांचे सरकार किंवा नरसिम्हा राव यांच्या नंतर आलेले देवेगौडा, इंदर कुमार गुजराल यांचे सरकार किंवा एनडीए सरकार जाऊन आलेले कॉंग्रेस सरकार बनवण्यात निर्णायक भूमिका बजावून ह्यांनी सर्वहारा वर्गाचे असे काय भले केले? इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की मागच्या अडीच दशकांच्या काळात जी जी सरकारे आली त्या सर्वांनी नवउदारवादी धोरणे जोरात रेटली, ज्यामुळे देशातील कामगारांचे जीवन अधिकाधिक खडतर करून ठेवले आहे. रिपोर्ट मध्ये नवउदारवादी धोरणांच्या विरोधात मगरीचे अश्रू गाळले आहेत, परंतु नवउदारवादाची ही प्रक्रिया पुढे नेण्यामध्ये ह्या संशोधनवादी पक्षाच्या निवडणुकांमधील आघाड्या, बुर्झ्वा पक्षांसोबतचे गळ्यात गळे घालणे आणि पश्चिम बंगाल व केरळ मधील ह्यांच्या कारनाम्यांची काय भूमिका राहिली आहे, ह्याच्या आत्मालोचनेबद्दल चकार शब्द सुद्धा काढलेला नाही. खरे तर ज्या पक्षाने संशोधनवादाच्या मार्गाने पुढे जाण्यालाच जर त्यांची रणनीती बनवली आहे त्यांच्या कडून आत्मालोचनेची अपेक्षा करणे भाबडेपणाचे आहे.

रिपोर्ट मधील बिंदू ७ मध्ये पक्षाने आत्मस्तुतीचा हास्यास्पद प्रयत्न करत म्हटले आहे की १९९१ पासून नवउदारीकरणाच्या विरोधात एकत्र प्रतिकार करण्याच्या हेतूने देशपातळीवर आजवर १५ सार्वत्रिक संप झाले आहेत. आता हे सगळेच जाणतात की ज्याप्रमाणे ‘माकप’ प्रत्येक ३ वर्षांनंतर पार्टी कॉंग्रेस आयोजित करण्याचा सोपस्कार पूर्ण करते, त्याच प्रमाणे प्रत्येक २ वर्षांत एकदा सार्वत्रिक बंदची हाक दिली जाते. ह्या संप दरम्यान पक्ष कार्यकर्ते बळजबरीने दुकाने आणि कार्यालये बंद करण्यास भाग पाडतात. तर दुसरीकडे पक्षाचे मोठे नेते दिल्लीत ‘जंतरमंतर’वर गरमागरम भाषणे देऊन स्वतःला पोलिसांकडून अटक करवून घेण्याचा तमाशा करतात. पोलिसांच्या गाडीत बसून फोटो सेशन झाले कि मग ह्यांना सोडण्यात येते. हे सगळं नाटक इतकं ठरवून केल्या सारखं असतं की सामान्य माणसाच्याही ते लक्षात येतं. ह्या नौटंकीलाच हे संसदीय दगाबाज देशव्यापी सार्वत्रिक बंदचे नाव देतात आणि निर्लज्जपणे ह्याला स्वतःच्या उपलब्धीच्या रुपात सादर करतात.


त्यानंतर ही रिपोर्ट डाव्या आणि लोकशाही आघाडीच्या संकल्पनेबद्दल आपले ज्ञानवर्धन करते. त्यानंतर बिंदू १४ मध्ये हे कबूल करण्यात आले आहे की संयुक्त लोकशाही आघाडीची संकल्पना मांडली गेल्यानंतर ३५ वर्षांनंतर सुद्धा अजूनही अशी अखिल भारतीय डावी लोकशाही आघाडी उभी राहू शकलेली नाही. हे नागडे सत्य तर सर्वच जाणतात. पण जी संकल्पना मांडली जाऊन ३५ वर्षे उलटून गेल्यानंतर केल्या जात असलेल्या समिक्षेकडून, ती संकल्पना वास्तविकतेशी किती मेळ खाते आणि ती लागू होऊ शकली नाही ह्याची कारणे काय आहेत, यावर भाष्य वाचायला मिळेल अशी अपेक्षा असते.

पुढे ह्या रिपोर्ट मध्ये ह्या अपयशाचे कारण सांगताना म्हटले आहे की तात्कालिक परिस्थितीमुळे पक्षाने डावी आघाडी आणि लोकशाही आघाडी निर्माण करण्याचे आपले रणकौशलात्मक लक्ष्य सोडून दिले आणि ती एक प्रचारात्मक घोषणा बनून राहिली. त्या ऐवजी डावी, लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष आघाडी हा तिचा मध्यावधी नारा बनला. त्यानंतर निवडणुकांसाठी धर्मनिरपेक्ष भांडवली पक्षांना एकत्र आणणे ही पार्टीची प्राथमिकता बनली. दुसऱ्या टप्प्यात संयुक्त आंदोलने आणि संघर्षांच्या माध्यमातून किमान समान

**पान ९ वर**

## सीताराम येचुरी ‘माकप’चे बुडते जहाज तारू शकतील?

‘माकप’च्या २१व्या कॉंग्रेस दरम्यान झालेल्या नेतृत्वबदलाची बातमी प्रसारमाध्यमांमध्ये मोठ्या चर्चेचा विषय ठरली. पार्टी महासचिव पदी निवड झाल्यानंतर काही तासांच्या आतच येचुरींनी एका खाजगी इंग्लिश वृत्त-वाहिनीला दिलेल्या मुलाखती मध्ये सांगितले की धर्माबद्दल त्यांचे काहीही आक्षेप नाहीत आणि त्यात भर घालत त्यांनी अभिमानाने सांगितले की माझं तर नावच ‘सीताराम’ आहे! माकपचे समर्थक आणि सज्जन-भोळे डावे समर्थक त्यांच्या कडून पक्षाची ही बुडती नौका तारण्याची भोळी अपेक्षा बाळगून आहेत. पण या महाशयांचा मागचा इतिहास पाहिला तर सहज लक्षात येईल की पक्षाची डूबती नौका सावरणे तर सोडाच पण पक्षाची नौका बुडवण्यामध्ये यांचा काही कमी वाटा नाहीये. बुर्झ्वा माध्यमे त्यांचे गुणगान करत असताना त्यांचा उल्लेख ‘व्यावहारिक’ आणि ‘लवचिक’ राजकारणी म्हणून करतात. त्यांचे सर्वपक्षीय सौहार्दाचे संबंध आहेत. अशा व्यावहारिक, लवचिक आणि अजातशत्रू माणसाकडून केवळ हीच आशा ठेवली जाऊ शकते की त्यांच्या नेतृत्वाखाली तमाम भोळ्या ‘माकप’ समर्थकांचा भ्रम तुटेल, जे अजूनही ‘माकप’ला संशोधनवादी मानत नाहीत. ‘माकप’मध्ये येचुरींना बंगाल प्रदेश कार्यकारणीचा पाठींबा आहे. ह्या बंगाल प्रदेश कार्यकारणीच्या मार्गदर्शनाखालीच सिंगूर, नंदीग्राममधील घटना अमलात आणल्या गेल्या होत्या. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की पक्षाच्या राजकीय-रणकौशलात्मक दिशेची समीक्षा करणारा जो रिपोर्ट २१व्या कॉंग्रेसमध्ये पारित केला आहे, त्याच्या तयारीसाठी ऑक्टोबर, २०१४ मध्ये बोलावण्यात आलेल्या पॉलिटब्युरोच्या बैठकीत येचुरी यांनी एक



असहमती नोट मांडली होती. त्यांच्या मते अशा प्रकारच्या कुठल्याही समीक्षेची गरज नाही, कारण पक्षाच्या राजकीय-रणकौशलात्मक दिशेमध्ये कोणताही दोष नसून दोष ती दिशा लागू करताना पक्ष नेतृत्वाकडून होणाऱ्या चुकांचा आहे. म्हणजेच समीक्षा रिपोर्ट तयार करत असताना पक्षातून जी नाममात्र टीका केली गेली होती, ती सुद्धा येचुरींना मान्य नव्हती. नोंद घेण्यासारखी गोष्ट ही आहे की येचुरी ‘माकप’मधील सापेक्षतः मवाळ गटात मोडतात, जे नव उदारीकरणाच्या धोरणांबाबत अधिकच उदार आहेत आणि ज्यांना कट्टरपंथी भाजपला सरकार बनवण्यापासून रोखण्या करिता कॉंग्रेसच्या गळ्यात गळे घालणे सुद्धा निषिद्ध नाही. २००४ मध्ये यूपीए सरकार स्थापन करण्यात ह्यांचा बहुमोल वाटा होता. नव-उदारवादाचे ‘डार्लिंग बॉय’ असलेल्या चिदम्बरम यांच्यासह त्यांनीच तथाकथित ‘किमान समान कार्यक्रम’ तयार केला होता. अजून एक गोष्ट आठवावी लागेल. १९९६ मध्ये ‘माकप’मध्ये प्रकाश करात यांच्या तुलनात्मक जहाल संशोधनवादी कार्यदिशेच्या दबावाखाली ज्योती बसू पंतप्रधान बनू शकले नाहीत, त्यावेळी प्रकाश करात यांना विरोध करणाऱ्यांमध्ये हरकिशन सुरजित व ज्योती बसूंबरोबर सीताराम येचुरी सुद्धा सहभागी होते. निवडणुकांमधील डावपेच व सरकार बनवण्यात/पाडण्यात तरबेज असलेल्या आणि बुर्झ्वा माध्यमे सुद्धा ज्यांना भारतीय राजकारणाचे चाणक्य असा “गुणगौरव” करतात त्या हरकिशन सिंह सुरजित यांचे येचुरी शिष्योत्तम आहेत. तसे बघितले तर ह्या संशोधनवाद्यांमध्ये अगदी सुरुवाती पासूनच मवाळ संशोधनवादी व जहाल संशोधनवादी असे दोन गट राहिले आहेत. ६०च्या दशकांत अखंडित ‘भाकप’ मध्ये डांगे-राजेश्वर राव गट मवाळ होता तर बसवपुनैय्या-नम्बुद्रीपाद-सुन्दरैय्या-गोपालन-रणदिवे गट तुलनात्मक दृष्ट्या जहाल संशोधनवादी होता. पुढे ‘माकप’ची स्थापना झाल्यानंतर बसवपुनैय्या-सुन्दरैय्या-गोपालन-प्रमोद दासगुप्ता यांचा गट जहाल होता तर सुरजित-बसू यांचा गट मवाळ होता. त्यामुळे आपल्या सहजच लक्षात येईल कि येचुरी ‘माकप’ मधील मवाळ संशोधनवादी गटाचे प्रतिनिधित्व करतात आणि ‘माकप’ला संशोधनवादाच्या अधिक खोल गर्तेत घेऊन जाणार आहेत. ह्याचीच एक चुणूक नुकतीच बघायला मिळाली जेव्हा भूमी अधिग्रहण बिल संसदेत सादर झाल्यानंतर येचुरी सोनिया गांधींचे शेपूट बनून सर्वपक्षीय शिष्टमंडळासोबत राष्ट्रपती भवनात गेले. येचुरींच्या ‘अजातशत्रू’ आणि ‘लवचिक’ व्यक्तिमत्वाकडे बघून ही भविष्यवाणी केली जाऊ शकते की येत्या काळात संयुक्त मोर्चे बनवण्याचे असे हास्यास्पद प्रयत्न पुन्हा बघावयास मिळू शकतात.

पान ८ वरून

कार्यक्रमावर आधारित तिसऱ्या आघाडीचा पर्याय निर्माण करायचा होता आणि डावी-लोकशाही आघाडी निर्माण करण्याचे लक्ष्य ह्या तिसऱ्या टप्प्यात अपयशी ठरले. माकप बदललेल्या परिस्थितीचा दाखला कितीही देवो, जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा इतिहास साक्ष आहे की संशोधनवादाच्या गटारगंगेत उतरल्या नंतर पार्टीचे पतन निश्चित असते आणि अश्या वेळी सर्व संशोधनवादी पक्ष आपले पतन झाकण्यासाठी बदललेल्या परिस्थितीचे कारण पुढे करतात. सत्य तर हे आहे की साडे तीन दशकांपूर्वी ज्यावेळी माकपने डाव्या-लोकशाही आघाडीची मांडणी केली होती तेव्हा सुद्धा माकप संसदीय राजकारणाच्या चौकटीबाहेर विचार करत नव्हती. कोणतीही कम्युनिस्ट पार्टी जर बुर्झ्वा संसदीय राजकारणाला केंद्रस्थानी ठेऊन रणनीती आणि रणकौशलात्माक निर्णय घेत असेल तर तिची अवस्था 'माकप'सारखीच होईल. परंतु समीक्षा रिपोर्ट मध्ये कुठेही पक्षाने आपली ही मूलभूत चूक मान्य केलेली नाही. ही चूक ते मान्य सुद्धा का करतील? कारण त्यांना संशोधनवादाच्या गटारगंगेत अजून जास्त डुबक्या मारायच्या आहेत.

समीक्षा रिपोर्टच्या बिंदू २२ मध्ये म्हटले आहे की तिसरा पर्याय उभा करण्याच्या नादात पार्टीचे स्वतःची स्वतंत्र शक्ती निर्माण करण्याकडे दुर्लक्ष झाले आणि पर्यायाने बुर्झ्वा धर्मनिरपेक्ष पक्ष पक्षाकडे आकर्षित झाले नाहीत. पुढे ह्याबद्दल खेद व्यक्त करत म्हटले आहे की मागील लोकसभा निवडणुकांमध्ये प्रादेशिक बुर्झ्वा पक्ष कुठल्याच राज्यात 'माकप'बरोबर निवडणूक आघाडी करण्यास तयार झाले नाहीत. प्रादेशिक पक्षांनी भाव दिला नाही म्हणून खेद व्यक्त करणाऱ्या संशोधनवाद्यांना हे सांगितले पाहिजे की जगभरातील संशोधनवाद्यांची हीच गत झालेली आहे. ते नेहमी हाच दावा करतात की डाव्यांना सशक्त बनवण्यासाठी बुर्झ्वा पक्षांबरोबर आघाड्या ह्या तात्कालिक रणकौशल्याचा भाग आहे, पण प्रत्येक वेळी बुर्झ्वा पक्ष त्यांचा कामापुरता उपयोग करून घेतात आणि गरज संपल्यावर दुधातून माशी वेगळी करावी तसे वाऱ्यावर सोडून देतात. रिपोर्ट मध्ये पुढे चालून बुर्झ्वा प्रादेशिक पक्षांबद्दल नाराजी व्यक्त केली गेली आहे आणि त्यांच्या बुर्झ्वा स्वरूपाबद्दल आणि संधीसाधूपणावर चर्चा केली आहे. कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या ह्या लाल पोपटांना कोणी तरी विचारले पाहिजे की आघाडी करण्याचे प्रयत्न करताना त्यांना ह्या पक्षांचे खरे रूप माहिती नव्हते काय? निर्लज्जपणाचा कळस म्हणजे एवढे सगळे लिहून पुन्हा ह्या पक्षांसोबत आघाडी करण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे! बिंदू ३० मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की भविष्यात बुर्झ्वा पक्षांमधील अंतर्विरोध स्पष्टपणे समोर येऊ शकतात. रिपोर्ट मध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की पार्टीला अश्या परिस्थितीमध्ये लवचिक धोरण स्वीकारावे लागेल. याचाच एक अर्थ हा आहे कि ह्या प्रादेशिक बुर्झ्वा पक्षासोबत पुनश्च आघाडी उभी करण्याची पटकथा लिहिली गेली आहे.

रिपोर्ट मध्ये पक्षाने स्वतःच्या छोट्या चुका कबूल सुद्धा केल्या आहेत परंतु मोठ्या चुकांचा उल्लेखसुद्धा नाही. उदाहरणार्थ पक्षाने हे स्वीकार केले आहे की १९९६ ते १९९८ दरम्यान संयुक्त आघाडीचे सरकार चालवण्यासाठी त्यांच्या नव-उदारवादी धोरणांकडे कानाडोळा करणे ही एक चूक होती, पण सबंध रिपोर्ट मध्ये कुठे सुद्धा ही गोष्ट कबूल केलेली नाही की पश्चिम बंगाल मध्ये त्यांच्या सरकारने तीच नव-उदारवादी धोरणे अत्यंत निर्लज्जपणे पुढे रेटली होती, ज्यामुळे त्यांचा जनाधार वेगाने कमी झाला. बिंदू ३८ मध्ये दबक्या आवाजात म्हटले आहे की नंदीग्राम मधील अधिग्रहण संपूर्ण देशाने कॉर्पोरेट नव-उदारवादी अजेंडाच्या रुपात बघितले आणि भविष्यामध्ये पश्चिम बंगाल सरकारने घेतलेल्या निर्णयांची आलोचनात्माक चिकित्सा करावी लागेल. एकंदरीत काय तर पार्टीचा हेतू भांडवलदारांना फायदा पोहचवण्याचा नव्हता परंतु लोकांनी त्याचा चुकीचा अर्थ काढला! संसदीय गटारगंगेत डुबकी मारण्यास आतुर झालेल्या ह्या संसदीय विदुषकांना त्या घटनेच्या इतक्या वर्षांनंतर सुद्धा त्याचे आलोचानात्मक विश्लेषण करण्यास वेळ मिळालेला नसेल, तर अश्या परिस्थितीमध्ये जनता वाट थोडीच बघत बसेल? तिने तिचा निर्णय दिला आहे.

रिपोर्टच्या बिंदू ४७ मध्ये संसदवादाची व्याख्या मांडताना म्हटले आहे की संसदवाद हा एक सुधारवादी दृष्टीकोन असून हा दृष्टीकोन पार्टीचे दैनंदिन कामकाज निवडणुकांच्या चौकटीत बंदिस्त करतो आणि हा भ्रम निर्माण करतो की केवळ निवडणुकांच्या माध्यमातून पक्षाची घोडदौड सुनिश्चित केली जाऊ शकते. ह्या मुळे जन-आंदोलन संघटित करणे, पार्टी निर्माण आणि विचारधारात्मक संघर्षाकडे दुर्लक्ष होते. 'माकप'ने ही व्याख्या जर प्रामाणिकपणे स्वतःवर लागू केली तर त्यांच्या हे लक्षात येईल की माकप ही एक संशोधनवादी पार्टी आहे. परंतु संशोधनवादी पलायनवाद्यांकडून अश्या साहसाची अपेक्षा करणेच चूक आहे.

माकप आपला संशोधनवादी चेहरा लपवण्याचा कितीही प्रयत्न करो, त्यांचे स्वतःचेच दस्तावेज त्यांना संशोधनवादी सिद्ध करतात. उदाहरणार्थ, संसदवादाची व्याख्या मांडल्या नंतर रिपोर्टच्या बिंदू ४७ मध्ये पुढे पार्टीला संसदीय व संसदेतर कामे एक साथ करावी लागतील, असे म्हटले आहे. पार्टीच्या संसदीय कामांसोबत संसदेतर कामांना जोडून आपला संशोधनवादी चेहरा लपवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु संसदीय कामांना संसदेतर कामांच्या बरोबरीचा दर्जा देणे हाच संशोधनवाद आहे. साम्यवादाचे अत्यंत जुजबी ज्ञान असलेली व्यक्ती सुद्धा हे सांगू शकते की कुठलीही कम्युनिस्ट पार्टी संसदेतर कामांनाच आपली मुख्य रणनीती मानते आणि संसदीय कामे कधीच संसदेतर कामांच्या समतुल्य असू शकत नाहीत.


'माकप'च्या २१ व्या काँग्रेस मध्ये पास झालेला राजनैतिक प्रस्ताव सुद्धा त्यांचा संशोधनवादी चेहरा उघडा करतो. कामगार वर्गाशी केलेला विश्वासघात लपवण्यासाठी ह्या प्रस्तावामध्ये काही अन्य देशांमधील डाव्या शक्तींच्या आगेकुचीचे दाखले देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, ग्रीस मधील 'सिरीजा'च्या विजयाला नव-उदारवादाविरुद्धचा एक मोठा विजय मानण्यात आले आहे. प्रत्यक्षात बघितले तर ही काँग्रेस सुरु होण्याच्या आधीच 'सिरिजा'ने नव-उदारवादाच्या समोर गुडघे टेकल्याच्या बातम्या येऊन थडकल्या होत्या. त्याच प्रकारे स्पेन मध्ये उदयास आलेल्या 'पोदेमॉस' ह्या पक्षाच्या आगेकुचीचे सुद्धा कौतुक करण्यात आले आहे. इथे हे लक्षात घेणे गरजेचे आहे की विचारधारात्मक पातळीवर बघितले तर 'पोदेमॉस' ही बऱ्याच अंशी भारतातील 'आम आदमी पक्षा'शी मिळती-जुळती आहे. अर्थात ह्यात आश्चर्य काहीच नाही. 'आम आदमी पक्षा'च्या उदयाबद्दल सुद्धा 'माकप' अशीच उत्साहित होती आणि त्यांच्याकडून बरेच शिकण्यासारखे आहे, असे मानत होती.

राजनैतिक प्रस्तावा मध्ये 'माकप'ने दक्षिण अमेरिकेतील देशांमधील डाव्यांना मिळालेल्या आघाडीला विशेष रेखांकित केले आहे. लक्षात घेण्याची बाब ही आहे की दक्षिण अमेरिकेतील देशांमध्ये जे डावे पक्ष सत्तेमध्ये आहेत त्यांनी जास्तीत जास्त कल्याणकारी राज्याची निर्मिती केली आहे. कोणतीही कम्युनिस्ट पार्टी जर अशा लोक कल्याणकारी राज्याचे मॉडेल समाजवाद म्हणून डोक्यावर घेऊन नाचत असेल तर त्यातच त्यांचे संशोधनवादी चरित्र स्पष्ट होते. एवढेच नाही तर 'माकप'ने चीनला समाजवादी देशांमध्ये अत्यंत वरचे स्थान दिले आहे. अजून एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे माकप सोविएत संघराज्याला १९९१ पर्यंत म्हणजेच त्याचे विघटन होईपर्यंत समाजवादी मानत होती. त्याच तर्काच्या आधारे माकप चीनला सुद्धा अजूनही समाजवादीच मानते आणि तोपर्यंत मानत राहील जोपर्यंत चीनमध्ये राज्य करणारी पार्टी स्वतःला कम्युनिस्ट पार्टी म्हणत राहील. ह्याचाच अर्थ माकप उत्पादन संबंधांच्या आधारे नव्हे तर शासन करणाऱ्या पक्षाच्या नावाच्या आधारे कुठल्याही देशाला समाजवादी मानते. हा ह्या पार्टीचा वैचारिक स्तर आहे! अर्थातच ह्यात आश्चर्यकारक असे काहीही नाही. एका संशोधनवादी पार्टी कडून ह्यापेक्षा अधिक वैचारिक प्रगल्भतेची अपेक्षा करणेच चूक आहे.

आपल्या राजनैतिक प्रस्तावामध्ये पार्टीने डावी-लोकशाही आघाडी बनवण्याच्या आपल्या भावी योजनेसाठी कार्यक्रमाची जी रूपरेखा तयार केली आहे तो कल्याणकारी राज्याचा तोच किन्सिअन उपाय आहे जो ती तिच्या जन्म काळापासून मांडत आली आहे. म्हणजे पुनश्च येरे माझ्या मागल्या! माकपला अजूनही कल्याणकारी राज्याचा काळ संपला आहे हे ऐतिहासिक सत्य पचवण्यास अवघड जात आहे. परंतु "जो पर्यंत बौद्ध भिक्कू आहोत, तोपर्यंत घंटा वाजवत राहू"च्या धर्तीवर जोपर्यंत ह्या संसदीय लाल पोपटांचे अस्तित्व आहे, तोपर्यंत हे कल्याणकारी राज्याच्या किन्सिअन उपायांची घंटा वाजवून जनतेमध्ये भ्रम निर्माण करत राहतील. तरी नशीब, संपूर्ण जगामध्ये कल्याणकारी बुर्झ्वा राज्याचा किन्सिअन उपाय इतिहास जमा झाला आहे. 'माकप'चे नवे सरचिटणीस सीताराम येचुरी आपल्या मुलाखतींमध्ये हे सांगत आले आहेत की "मार्क्सवाद परिस्थितीचे ठोस विश्लेषण करावयास शिकवतो". आता त्यांना कोणी तरी हे सांगण्याची गरज आहे की ठोस परिस्थितीचे ठोस विश्लेषण तर हे दाखवत आहे की 'माकप' अत्यंत वेगाने इतिहासाच्या कचराकुंडीत दाखल होत आहे! परंतु इतिहासात जमा होण्याआधी निवडणुकांच्या राजकारणात स्वतःचे महत्व वाढवण्यासाठी बुर्झ्वा पक्षांसाठी त्यांची भूमिका राहीलच!

**•आनंद**

**मराठी अनुवाद - अमित शिंदे**




# नारायण सुर्वे यांची कविता

# कार्ल मार्क्स

माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला.
मिरवणुकीच्या मध्यभागी
माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता.
जानकी अक्का म्हणाली, 'वळिखलंस ह्याला –
ह्यो आमचा मार्कसबाबा
जर्मनीत जलमला, पोताभर ग्रंथ लिवले
आणि इंग्लंडच्या मातीला मिळाला.
'सन्याषाला काय बाबा
सगळीकडची भूमी सारखीच
तुझ्यासारखी त्यालाही चार कच्चीबच्ची होती.'
माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला.

पुढे एका सभेत मी बोलत होतो,
– तर या मंदीचे कारण काय
दारिद्र्याचे गोत्र काय
पुन्हा मार्क्स पुढे आला; मी सांगतो म्हणाला,
आणि घडाघडा बोलतच गेला.
परवा एका गेटसभेत भाषण ऐकत उभा होता.
मी म्हणालो –
'आता इतिहासाचे नायक आपणच आहोत,
यापुढच्या सर्वच चरित्रांचेही.'
तेव्हा मोठ्याने टाळी त्यानेच वाजविली
खळखळून हसत, पुढे येत;
खांद्यावर हात ठेवीत म्हणाला,
'अरे कविता-बिविता लिहितोस की काय
छान, छान.
मलासुद्धा गटे आवडायचा.'



# मदर जोन्स : कामगारांची लाडकी आजी आणि भांडवलदार वर्गासाठीची "सर्वात धोकादायक स्त्री"

स्वातंत्र्य आणि समतेसाठीच्या कामगार वर्गाच्या दीर्घ काळच्या लढाईने शेकडो अशा महिलांना जन्म दिला आहे ज्यांनी केवळ नफेखोरांच्या मनात दहशत निर्माण केली नाही, तर त्या नव समाजाच्या निर्मितीमध्ये स्वतःला झोकून देणाऱ्या नवीन पिढीच्या प्रेरणास्तंभ बनल्या आहेत. अशा स्त्रियांपैकी एक होत्या अमेरिकेमधील मैरी जोन्स! कामगार त्यांना प्रेमाने मदर जोन्स म्हणत असत तर भांडवलदार त्यांना "अमेरिकेतील सर्वात धोकादायक स्त्री"!

१ मे,१८३० रोजी आयर्लंड मध्ये जन्मलेल्या मैरी हैरिस १८३८ मध्ये आपल्या कुटुंबासोबत अमेरिकेमध्ये आल्या. शालेय शिक्षण झाल्यानंतर त्यांनी सुरुवातीस कपडे शिवण्याचे आणि त्यानंतर शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. १८६१ मध्ये त्यांनी पोलाद कारखान्यात काम करणारे कामगार आणि ट्रेड युनियन कार्यकर्ता जार्ज जोंसबरोबर विवाह केला. परंतु लग्नानंतर ६ वर्षांच्या आतच काविळीच्या साथीमध्ये त्यांच्या पतीचा आणि चार मुलांचा मृत्यू झाला. त्यानंतर मैरी जोंस शिकागोला राहण्यासाठी आल्या आणि कपडे शिवण्याचे काम करू लागल्या. परंतु काही काळानंतरच १८७१ मध्ये शिकागो मध्ये लागलेल्या आगीमध्ये त्यांचे घर जळून राख झाले. त्यानंतर त्यांनी एका चर्चच्या तळघरात शरण घेतली. असेच एका दिवशी रस्त्यांवर भटकत असताना त्या 'नाइट्स ऑफ लेबर' नामक कामगार संघटनेच्या संपर्कात आल्या आणि त्यांच्या बैठकांना जाऊ लागल्या. त्यानंतर त्यांनी कामगार आंदोलनामध्ये स्वतःचे सर्वस्व झोकून दिले आणि आयुष्यभर त्यांनी कामगार चळवळ पुढे नेण्यासाठी योगदान दिले. कामगारांना संघटीत करण्यासाठी त्या देशभर फिरून आपल्या उत्साही भाषणांनी कामगारांना प्रोत्साहित करू लागल्या. यूनियन संगठनकर्त्यांच्या रूपातील आपल्या कित्येक दशकांच्या दीर्घ आयुष्यात मैरी हैरिस जोंस यांनी कोळसा उद्योग, कापड उद्योगामधील बाल कामगारांना, रेल्वे वाघिणी बनवण्याच्या कारखान्यांमधील व खनिज उत्खनन उद्योगातील कामगारांना संघटीत केले. मदर जोंसने तिच्या आयुष्याचा दीर्घ कालावधी खाण कामगारांना संघटीत करण्यात व्यतीत केला. वेस्ट वर्जीनिया व पेनसिल्वेनिया प्रांतामधील कामगारांना युनियन बनवण्याचा त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या जीवनाची ४० वर्षे खर्ची घातली. एका इतिहासकाराच्या शब्दांमध्ये, "खाण कामगारांच्या संघर्षांमध्ये त्या दरी-खोरे पार करून पत्रके वाटण्याचे काम पार पडत असत. वेळप्रसंगी निर्भीडपणे बंदुकांच्या समोर उभ्या ठाकत आणि नेहमीच शिपायांना "हिम्मत असेल तर एका म्हाताऱ्या स्त्रीला गोळी मारा" असे खोचक आव्हान देत असत.

**कामगार नायक, क्रांतिकारी योद्धा**



मदर जोंसने कामगार वस्त्यांमधील स्त्रियांना संघटित करून त्यांना कामगार वर्गाच्या हिताच्या लढाईमध्ये सक्रिय केले आणि त्यांना कामगार चळवळीचा महत्वाचा भाग बनवले. त्यांचे एक सर्वात प्रभावी हत्यार होते - "भांडी-थाळी ब्रिगेड"! १९०० मध्ये पेनसिल्वेनिया मधील कोळसा कामगार जेव्हा संपावर गेले होते तेव्हा मदर जोंसने स्त्रियांना संघटित करून संप तोडू पाहणाऱ्यांना संपकरी कामगारांच्या जागी कारखान्यात काम करण्यास जाण्यापासून रोखले होते. ह्या सगळ्या स्त्रिया कोळसा खाणींच्या गेट वर उभ्या राहिल्या आणि त्यांच्या हातातील भांडे, थाळ्या जोरजोरात वाजवून आणि झाडू उंचावून गद्दार कामगारांना तिथून पळवून लावले. मदर जोंसने तिच्या एका पत्रामध्ये लिहिले आहे, "त्या दिवसापासून सर्व कामगार स्त्रिया कोळसा खाणींच्या गेटवर नजर ठेऊ लागल्या, जेणे करून कंपनी संप तोडण्यासाठी बाहेरून कामगार आणू शकणार नाही. प्रत्येक दिवशी कामगार महिला एका हातात झाडू, पातेली घेऊन आणि दुसऱ्या हातामध्ये शालमध्ये गुंडाळलेली त्यांची चिमुकली बाळे घेऊन खाणींवर जाऊ लागल्या. त्यांनी कोणालाही खाणींच्या आत घुसू दिले नाही. सूत मिल्स आणि कोळसा खाणींमध्ये बाल कामगारांकडून ज्या परिस्थितीमध्ये काम करवून घेतले जात असे, ते पाहून मदर जोंस रागाने लाल होत असे. बाल कामगारांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्यांनी दक्षिणेकडून कपड्यांच्या कारखान्यांमध्ये काम सुद्धा केले. केनसिंगठन मध्ये १९०३ मध्ये कपडा मिल कामगारांच्या संपाला समर्थन मिळवून देण्यासाठी तिथे गेलेल्या मदर जोंस त्यांच्या त्या अनुभवाबद्दल लिहितात, "दररोज छोटी-छोटी मूले युनियनच्या कार्यालयात येत असत. कोणाचा हात चिरडला गेला असायचा, कोणाचा अंगठा गायब झालेला असायचा तर कोणाची अख्खी बोटे तुटलेली असायची. ही मुले त्यांच्या वयापेक्षाही लहान भासत, अगदी अशक्त आणि रोगट. त्यांपैकी कित्येक मुलांचे वय दहा वर्षेसुद्धा नसेल, जरी स्थानिक कायद्यानुसार १२ वर्षाखालील मुलांना कामगार म्हणून ठेवण्यास मनाई होती." मदर जोन्स लहानग्यांचे शोषण थांबवण्यासाठी कायदा बनवण्यासाठीच्या मागणीसाठी मुलांचा एक मोठा मोर्चा घेऊन राष्ट्रपति थिओडोर रूजवेल्ट यांना भेटावयास गेल्या, जे त्यावेळी न्यूयार्क मधील बंगल्यावर सुट्या घालवत होते. राष्ट्रपतींनी त्यांना भेटण्यास नकार दिला. पण जनतेच्या दबावाखाली पेनसिल्वेनियाच्या विधानसभेला बाल कामगार कायद्यात सुधारणा करावी लागली. मदर जोंस शंभर वर्षे जगल्या आणि शेवटच्या श्वासापर्यंत त्या अमेरिकेतील कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठीच्या संघर्षात कुठल्या न कुठल्या प्रकारे सहभागी होत राहिल्या.

दीर्घ संघर्षाच्या ह्या काळात अमेरिकेच्या कामगारांनी बरेच अधिकार प्राप्त केले आणि नरकप्राय, गुलामगिरीच्या जगण्यातून स्वतःची मुक्ती करून घेतली. अमेरिकी भांडवलदारांनी जगभरातील कष्टकरी जनतेचे शोषण करून आपल्या देशातील कामगारांना बऱ्याचश्या सुविधा सुद्धा दिल्या. ह्याच सुविधाप्राप्त कामगारांमधून बाहेर पडलेल्या खात्या-पित्या कुलीन कामगारांनी अल्बर्ट पार्सन्स व मदर जोंस यांसारख्यांची महान परंपरा असलेल्या अमेरिकन कामगार चळवळीला कलंकित केले आहे. परंतु भारतासहित तिसऱ्या जगातील करोडो कामगार तश्याच पद्धतीचे नारकीय जीवन जगात आहेत ज्या विरुद्ध शंभर वर्षांपूर्वी मदर जोंस यांनी संघर्ष केला होता. त्या सर्वांसाठी मदर जोंस यांचे जीवन प्रेरणेचा न अटणारा स्रोत आहे.

# उत्तर-पूर्व दिल्लीमधील खजूरी भागात सांप्रदायिक वातावरण तयार करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुन्हा सक्रिय

मोदी सरकारच्या 'सबका साथ-सबका विकास' आणि सगळ्यांसाठी 'अच्छे दिन'च्या घोषणांची हवा एका वर्षातच निघून गेली आहे. आता सामान्य कष्टकरी जनतेला हे समजून चुकले आहे मोदी सरकार कोणाचा विकास करू इच्छिते आणि कोणाच्या 'अच्छे दिन'साठी मोदी जगभर फिरत आहेत. परंतु मोदींनी निवडणुकांदरम्यान जी आश्वासने दिली होती त्यावर सामान्य कष्टकरी जनतेने प्रश्न उपस्थित करू नये व ती सरकारच्या कामगार विरोधी धोरणांच्या विरोधात एकजूट होऊ नये याकरिता राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आर.एस.एस.) देशभरात आता आपला खरा धार्मिक ध्रुवीकरणाचा अजेंडा राबवण्याच्या कामी लागला आहे.

दिल्ली-एनसीआर मध्ये ठीक-ठिकाणी असे प्रयत्न सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी फरीदाबाद जवळील अटाली गावामध्ये लोकांची घरे व मस्जिद तोडण्यात आली. त्यामुळे शेकडो लोक आज बेघर झाले आहेत आणि उघड्यावर राहत आहेत. मुरादाबाद पासून मुजफ्फरनगर पर्यंत कित्येक भागांमध्ये आर.एस.एस. सांप्रदायिक सौहार्दाचे वातावरण बिघडवण्याचे काम युद्धपातळीवर करत आहे. ह्याच मालिके मध्ये उत्तर-पूर्व दिल्लीतील खजूरी भागातील श्रीराम कॉलोनी मधील दोन समुदायांच्या मुलांमध्ये झालेल्या किरकोळ भांडणाला सांप्रदायिक रंग देण्यासाठी आर.एस.एस. हरतऱ्हेने प्रयत्न करत आहे. २७ जून, २०१५ रोजी ह्या कॉलोनीतील रामलीला ग्राउंडवर (राजीव पार्क) काही मुस्लिम मुले बैटमिंटन खेळत होते. त्याच मैदानावर आर.एस.एस.ची शाखा लावत असलेल्या मुलांनी दुसऱ्या समाजाच्या मुलांना शाखा सुरु असतानाच्या वेळी तिथे खेळण्यास मज्जाव केला. आर.एस.एस. शी संबंधित ह्या मुलांनी दुसऱ्या समाजाच्या ह्या मुलांना शिवीगाळ करत मैदानातून हुसकावून लावले. ह्या कामी त्यांना आर.एस.एस. मधील जेष्ठ लोकांची साथ सुद्धा मिळाली. दुसऱ्या दिवशी म्हणजेच २८ जून रोजी जेव्हा आर.एस.एस.शी संबंधित मुलं मैदानावर पोहोचली तेव्हा दुसऱ्या समाजाच्या मुलांनी योजना करून त्यांना जबरदस्त मारहाण केली. त्यानंतर आर.एस.एस.ने त्याच दिवशी पोलिस स्टेशन मध्ये दुसऱ्या समाजातील मुलांविरोधात एफ.आई.आर. दाखल केली. एक-दोन दिवसांनंतर सर्व पाच मुलांना अटक करण्यात आली. पोलिस त्याच्या कडून कारवाई करत आहेत.

परंतु दुसऱ्याच दिवशी (२९ जून, २०१५) आर.एस.एस. चे शेकडो स्वयंसेवक रामलीला मैदानावर जमा झाले आणि दुसऱ्या समाजाविरोधात भडकाऊ भाषणे देऊ लागले. त्याच बरोबर "जो मैदानात पाय ठेवेल तो मरेल" अश्या घोषणा देऊ लागले. त्याच दिवशी आर.एस.एस. कडून घोषणा करण्यात आली की १७ ते १९, जुलै, २०१५ दरम्यान त्याच मैदानावर त्यांचे 'महा-संमेलन' होईल आणि त्या दरम्यान कुठल्याही अन्य व्यक्तीला मैदानावर येऊ दिले जाणार नाही. लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की १८ किंवा १९ जुलै, २०१५ दरम्यान ईद सुद्धा आहे आणि दरवर्षी ह्याच मैदानावर ईदची नमाज होते. आर.एस.एस. कडून त्याच वेळी 'महा-संमेलनाची' घोषणा करण्यात आल्यामुळे मुस्लीम बहुल भागांमध्ये तणावाची स्थिती तयार झाली आहे. त्या दिवसापासून दररोज सकाळी सकाळी आर.एस.एस.चे लोक शाखा लावत आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिस सुद्धा देण्यात आले आहेत आणि शाखेच्या वेळी अन्य कोणालाही मैदानावर प्रवेश दिला जात नाही.

ह्या कॉलनी मधील लोकांनी सकारात्मक पाउल उचलत ईद दिवशी आर.एस.एस. कडून शाखा लावण्यात येऊ नये आणि योग्य सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी ह्या मागणी साठी दिल्ली पुलिस कमिश्नर सोबत भेट सुद्धा घेतली होती. परंतु त्यांच्या कडून सुद्धा ह्या बाबतीत कुठलेच ठोस आश्वासन मिळाले नाही. उलट राजकीय दबावामुळे ह्या भागातील एस.एच.ओ. व डी.सी.पी.ने स्पष्टपणे सांगितले आहे की ईद दिवशीसुद्धा आर.एस.एस.चे लोक तिथे येतील आणि प्रशासन त्यांना मज्जाव करणार नाही. त्यांच्या मते शाखा संपल्यानंतर मैदानात नमाज होऊ शकेल. इथे हे सांगणे आवश्यक आहे की मागच्या वर्षी ईद (बकरी ईद)च्या वेळी सुद्धा हेच ठरले होते. पण संघाच्या लोकांनी वेळेत मैदान रिकामे न केल्यामुळे मुस्लिम समाजाचे काही लोक भडकले होते आणि त्यांची संघाच्या काही जणांशी बाचाबाची सुद्धा झाली होती. आर.एस.एस. च्या लोकांनी मुस्लिम समाजातील बऱ्याच जणांवर मारहाणीचे खोटे दावे दाखले केले होते आणि त्यानंतर ह्या मुद्द्याला धार्मिक रंग देण्यात आला. ह्या वेळी सुद्धा दोन समाजातील मुलांमध्ये झालेल्या किरकोळ भांडणांना धार्मिक रंग देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. अर्थातच आता ह्यात मुस्लिम कट्टरपंथी सुद्धा मागे नाहीयेत. त्यामुळे शक्यता आहे की ह्यावर्षी ईद दिवशी सांप्रदायिक तणावाची स्थिती निर्माण होईल. ही रिपोर्ट लिहिली जाई पर्यंत हे ठरले होते की इथे काम करणारी संघटना 'नौजवान भारत सभा' सोबत कॉलनी मधील लोक दिल्ली पुलिस कमिश्नरला भेटतील आणि गरज पडली तर सर्व लोकांना सोबत घेऊन ह्या संबंधी याचिका न्यायालयात दाखल करतील.

दिल्ली-एनसीआर मध्ये घडत असलेल्या ह्या घटनांमधून हे अगदी स्पष्ट आहे की संघ परिवार (आर.एस.एस.) सांप्रदायिक तणावाचा विस्तव निर्माण करू इच्छित आहे, जेणे करून वेळ पडल्यास त्याला हवा देऊन धार्मिक उन्माद निर्माण करता येईल आणि लोक संघटीत होऊन शोषक व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करण्याऐवजी एकमेकांमध्ये संघर्ष करत राहतील. परंतु कष्टकरी जनतेने हे समजून घेतले पाहिजे की धार्मिक कट्टरपंथी आपल्याला एकमेकांमध्ये लढवतात आणि स्वतः सुरक्षित घरांमध्ये राहतात. आपण त्यांच्या जाळ्यात अडकून आपल्याच वर्ग बांधवांच्या विरोधात लढतोत. खरे तर आपले जीवन बदलण्यासाठीच्या संघर्षांसाठी सर्व कष्टकरी जनतेची एकजुटता ही पहिली अट आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

•दिल्ली वार्ताहर

# इंडोनेशिया मधील १० लाख कम्युनिस्टांच्या शिरकाणाची ५० वर्षे

आज पासून जवळपास ५० वर्षापूर्वी, ८ ऑक्टोबर, १९६५ रोजी इंडोनेशिया मध्ये तेथील लष्कराने 'पीकेआई' (इण्डोनेशियाची कम्युनिस्ट पार्टी) विरुद्ध केलेल्या सैन्य कारवाई मध्ये 10 लाखांहून अधिक कम्युनिस्ट व त्यांच्या समर्थकांचे शिरकाण करण्यात आले होते आणि ७ लाखांहून अधिक लोकांना तुरुंगात डांबण्यात आले होते. हा नरसंहार घडवून आणणाऱ्या लष्कर प्रमुख सुहार्तो याने मार्च १९६६ मध्ये राष्ट्रपति सुकर्ण यांचे सरकार उलथून लावले आणि सत्ता आपल्या हातात घेतली.

२०व्या शतकात इंडोनेशिया मध्ये झालेल्या ह्या अमानुष नरसंहारावर कॉरपोरेट मीडिया आणि जगभरातील सबंध भांडवली देशांनी घेतलेल्या 'अळीमिळी गुपचिळी' च्या भूमिकेवर आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. हा नरसंहार इंडोनेशियन लष्कर आणि अमेरिकन साम्राज्यवादाच्या हातमिळवणीतून घडवला गेला होता, ह्याचे भक्कम पुरावे आजही उपलब्ध आहेत.

'पीकेआई' (इण्डोनेशियाची कम्युनिस्ट पार्टी) ची स्थापना १९२० मध्ये झाली होती आणि लवकरच ही जगातील सर्वात मोठ्या कम्युनिस्ट पक्षांपैकी एक बनली. इंडोनेशिया मधील कामगार-शेतकऱ्यांमध्ये ह्या पक्षाचा व्यापक आधार होता आणि साम्राज्यवाद विरोधी सशस्त्र संघर्षामध्ये पार्टीने जनतेचे नेतृत्व केले होते. १९६५ पर्यंत त्यांची पक्ष सदस्यसंख्या ३५ लाख इतकी होती आणि ह्यात कामगार, शेतकरी, विद्यार्थी-युवक व महिलांशी संबंधित विविध जन-संघटनांची सदस्य संख्या जोडली तर ही संख्या ३ कोटी इतकी होती. त्या वेळी इंडोनेशियाची एकूण लोकसंख्या ११ कोटी इतकी होती.

इंडोनेशियामध्ये कम्युनिस्टांच्या वाढत्या प्रभावामुळे अमेरिका अस्वस्थ होती. अमेरिका अगोदरच लाओस, कंबोडिया व व्हिएतनाम युद्धात अडकून पडली होती आणि व्हिएतनाम मधील कम्युनिस्टांच्या चिवट प्रतिकारामुळे हतप्रभ झाली होती. दुसरीकडे चीन मध्ये कम्युनिस्ट सरकार अधिकाधिक मजबूत होत होते आणि उत्तर कोरियामध्ये सुद्धा कम्युनिस्ट सत्तेमध्ये आले होते. अमेरिकन गुप्तहेर संघटना ह्या निष्कर्षापर्यंत पोहोचल्या होत्या की कुठलेही पाऊल उचलले नाही तर २-३ वर्षांच्या आत इंडोनेशियामध्ये सत्ता कम्युनिस्टांच्या हातात जाईल. त्याच बरोबर इंडोनेशियामध्येसुद्धा वर्गसंघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत चालला होता. राष्ट्रपति सुकर्ण जमीन सुधारणा लागू करण्यासाठी टाळाटाळ करत होते. कम्युनिस्टांनी १९५९ चा 'बटाईदार कायदा' आणि १९६० चा 'कूळ कायदा' ह्यांच्या आधारे शेतकऱ्यांना आवाहन केले की हे कायदे अमलात आणण्यासाठी शेतकऱ्यांनीच पुढे यावे. त्याला प्रतिसाद देत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी जमीन अधिकारांसाठी संघटीत होण्यास सुरुवात केली. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की इंडोनेशियाच्या लष्करातील बहुतांश अधिकारी हे सामंती पार्श्वभूमी असलेले होते आणि त्यामुळे ते कम्युनिस्टांचा विलक्षण तिरस्कार करत असत. १९६५ मध्ये ह्या अधिकाऱ्यांनी 'काउंसिल ऑफ़ जनरल्स' नावाने एका समितीची स्थापना केली आणि जनरल यानीच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये देशातील राजकीय परिस्थिती बद्दल चिंता व्यक्त केली. ह्या उच्च पदस्थ सैन्य जनरल्सना अमेरिकेचा वरदहस्त होता. त्यातून त्यांनी सुकर्ण यांना पदच्युत करण्याची व कम्युनिस्टांचे शिरकाण करण्याची योजना तयार केली आणि योग्य वेळेची वाट बघत बसले. लवकरच इंडोनेशिया मध्ये लष्कराकडून सरकार उलथवून टाकले जाणार असल्याच्या अफवा पसरू लागल्या. लष्करामध्ये खालच्या हुद्द्यांवर जे अधिकारी सुहार्तो प्रति निष्ठा ठेऊन होते ते ह्या अफवांच्या प्रभावात आले आणि त्यांनी ३० सप्टेंबर १९६५ रोजी काही उच्च पदस्थ जनरल्सना अटक केली. ह्यावेळी झालेल्या गोळीबारामध्ये एक जनरल मारला गेला. लष्कर ज्या संधीची वाट बघत होते ती संधी त्यांना मिळाली होती. ह्या सबंध घटनाक्रमाचे खापर 'पीकेआई'च्या डोक्यावर फोडण्यात आले आणि लवकरच सबंध देशभरात कम्युनिस्ट व त्यांच्या समर्थकांच्या संहाराचे भयंकर असे अभियान राबवण्यास सुरुवात झाली.

कित्येक महिने संपूर्ण इंडोनेशियामध्ये लष्कराच्या तुकड्या, गुंडांच्या टोळ्या आणि विखारी प्रचाराने भडकावले गेलेले मुस्लिम कट्टरपंथी कम्युनिस्ट व त्यांची सहानुभूती असलेल्या लोकांचे अमानुष शिरकाण करत राहिले. स्त्रिया, लहान मुले, म्हातारे कोणालाही ह्यातून सोडण्यात आले नाही. पुरोगामी विचारांचे शिक्षक, लेखक, कलाकार यांना सुद्धा यमसदनी पाठवण्यात आले. कित्येक लोकांचे शिर धडावेगळे करून बांबूवर टांगून फिरवले गेले. 'रेडक्रॉस इंटरनेशनल'च्या रिपोर्ट नुसार मृतदेहांमुळे कित्येक महिने ह्या भागातील नद्यांच्या पाण्याचा रंग लाल झाला होता आणि त्यामुळे महामारी पसरण्याचा धोका निर्माण झाला होता. आता अशे पुरावे समोर येत आहेत ज्यातून स्पष्ट होत आहे की 'सीआईए'ने कम्युनिस्ट आणि त्यांच्या सहानुभूतीदारांच्या याद्या इंडोनेशियन लष्कराला पुरवल्या होत्या. परंतु मागील ५० वर्षामध्ये इतिहासामधील ह्या बर्बर, अमानुष नरसंहारावर पडदा टाकण्यात आला.

स्टालिन, माओ यांना क्रूरकर्मा, हुकुमशहा घोषित करणारेडिस्कवरी व हिस्ट्री चैनल सारखे साम्राज्यवादी चैनल ह्या घटनेबद्दल मात्र मुग गिळून गप्प बसतात. इंडोनेशियामधील साम्राज्यवाद धार्जिण्या सरकारांनी मागील ५० वर्षांमध्ये ह्या घटनेचा उल्लेख करणे सुद्धा अपराध मानले होते. ह्या बद्दल न कुठल्या वर्तमान पत्रात लिहिले जाऊ शकत होते आणि न ह्या घटनेच्या चौकशीची मागणी केली जाऊ शकत होती. परंतु लाखो कम्युनिस्टांचे बलिदान असेच इतिहाच्या पडद्याआड जाणे शक्य नव्हते. आता इंडोनेशियामध्येसुद्धा इतिहासामधील ह्या रक्तरंजित काळावरचा पडदा उठत आहेत, दीर्घ काळची शांतता भंग होत आहे.


जनसमर्थन आणि संघटनात्मक विस्तार ह्या दृष्टीने बघितले तरी इंडोनेशियाची कम्युनिस्ट पार्टी एक अत्यंत मजबूत पार्टी होती. पण विचारधारात्मक दृष्ट्या ती स्वतःची धार गमावून बसली होती, नख-दंतविहीन झाली होती. तिने प्रत्यक्षात १९५०च्या दशकातच समाजवादी लक्ष्य प्राप्त करण्यासाठी शांततापूर्ण मार्ग निवडला होता. १९६५ पर्यंत तिने न केवळ आपल्या सशस्त्र तुकड्यांचे निशस्त्रीकरण केले पण त्याच बरोबर आपले भूमिगत संगठन सुद्धा नष्ट केले. विचारधारेच्या स्तरावर ती पूर्णपणे सोवियत संशोधनवादाबरोबर जाऊन मिळाली. तिने इंडोनेशियन राज्यसत्तेची संशोधनवादी व्याख्या प्रस्तुत केली आणि दावा केला की इथे राज्यसत्तेचे दोन पैलू आहेत - एक प्रतिक्रियावादी आणि दुसरा पुरोगामी. त्यांनी इथपर्यंत दावा केला की इंडोनेशिया मधील राज्यसत्तेचा पुरोगामी पैलूच प्रधान आहे. हि व्याख्या पूर्णपणे चुकीची होती आणि आजवरच्या क्रांतिकारी शिक्षेच्या पूर्णतः विरुद्ध होती. राज्यसत्ता नेहमीच जनतेवरील शक्ती प्रयोगाचे साधन राहिली आहे. राज्यसंस्था ही शोषणकर्त्यांच्या हातातील असे उपकरण आहे जिच्या मार्फत ते शोषणकारी संस्थांचा बचाव करतात. भांडवलशाही अंतर्गत प्रगतीशील पैलू असलेल्या राज्यसत्तेची व्याख्या करणे हे क्रांतीचा मार्ग सोडल्या सारखे आहे. ही राजकीय दिशा इतिहासामध्ये पूर्वी सुद्धा अपयशी ठरली होती आणि पुनश्च एकदा ती असफल होणे क्रमप्राप्त होते. परंतु ह्या चुकीच्या राजकीय दिशेची किंमत १० लाख कम्युनिस्टांना मृत्युच्या रुपात आणि लाखो लोकांना तुरुंगवासाच्या रुपात मोजावी लागली.

'सीपीएम'सारखे दुतोंडी कम्युनिस्ट पक्ष तर ह्या घटनेला विसरून ज्यांचे हात लाखो कम्युनिस्टांच्या रक्ताने लाल झालेले आहे अशा इंडोनेशियन कंपन्यांना हाताशी धरून पश्चिम बंगाल मध्ये विदेशी भांडवलासाठी पायघड्या अंथरत होते! परंतु सच्च्या कम्युनिस्टांनी आपल्या लाखो कम्युनिस्ट कॉम्रेड्सच्या नरसंहाराचा इतिहास विसरत कामा नये. भांडवलशाही आणि साम्राज्यवादाने आज पर्यंत रक्ताचे जे पाट वाहिले आहेत त्याची किंमत त्यांना भोगावीच लागेल!

•तपिश

## भारतीय जनतेचे जीवन, संघर्ष आणि स्वप्नांचे सच्चे चित्रण करणारे महान कथाशिल्पी प्रेमचंद यांच्या जन्मदिवसा (३१ जुलै) निमित्त

"स्वराज्य येऊन सुद्धा संपत्तीचे प्रभुत्व असेच कायम राहणार असेल आणि सुशिक्षित समाज असाच स्वार्थांध बनून राहणार असेल, तर माझ्या मते असे स्वराज्य न येणंच चांगलं. आङ्ग्लाळलेल्या अभिजनांची धनलोलुपता आणि सुशिक्षितांचा आपमतलबीपणाच आपली दुरवस्था करत आहे. जे दुर्गुण दूर करण्यासाठी आज आम्ही प्राण तळहातावर घेऊन काम करत आहोत, तेच दुर्गुण जनता केवळ त्यामुळे स्वीकार करेल की ते विदेशी नसून स्वदेशी आहेत? कमीत कमी माझ्या साठी तरी स्वराज्याचा अर्थ केवळ हा नाही की जॉनच्या जागी गोविंद विराजमान व्हावा".



– प्रेमचंद ('आहुति' कथेची नायिका)

"...अशा प्रकारची जबरदस्ती करण्यासाठी हवा तो कायदा बनवा. इथे सरकारला जाब विचारू शकेल असे कोणीही नाही. सरकारचे सल्लागार तर सेठ-महाजनच आहेत.
...हे सर्व नियम भांडवलदारांच्या फायद्यासाठी बनवण्यात आले आहेत आणि भांडवलदारांनाच ते नियम कुठे उपयोगात आणले जावेत हे ठरवण्याचे अधिकार सुद्धा देण्यात आले आहेत. कुत्र्याला भाकरीचा पहारेकरी बनवण्यात आले आहे.

– प्रेमचंद ('रंगभूमि' कादंबरी मधील पात्र सूरदास)




# श्रीमंतांसाठी 'स्मार्ट सिटी', कष्टकऱ्यांसाठी गलिच्छ झोपडपट्ट्या!

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या एक वर्षाच्या कार्यकाळात एक गोष्ट स्पष्टपणे समोर आली आहे ती म्हणजे हे सरकार एकंदरीतच समस्यांच्या मूळाशी न जाता केवळ लोकरंजक घोषणा देते आणि त्यानंतर सबंध भांडवली मिडिया, वृत्त वाहिन्या त्या मुद्यांवर भाडोत्री बुद्धीजीवी व पत्रकारांना स्टुडीओ मध्ये बसवून तासान तास चालणाऱ्या अर्थहीन चर्चा घडवून आणतात. ह्यामुळे समस्यांचे समाधान होत नाही पण जनतेला असे वाटते की त्यांच्यासाठी एका वर्षात जरी 'अच्छे दिन' आले नसले तरी नजीकच्या भविष्यात ते नक्कीच येणार आहेत. काही दिवसांपासून 'स्मार्ट सिटी' चे असेच एक पिल्लू जनतेमध्ये सोडण्यात आले आहे. आपल्याला असं सांगण्यात येत आहे की ग्रामीण भागातून शहरी भागांमध्ये होत असलेले स्थलांतर आणि शहरीकरणाचा वेग लक्षात घेता ह्या देशामध्ये १०० स्मार्ट सिटीज वसवण्यात येतील, ज्या मध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या मदतीने पाणी, वीज यांचा पुरवठा, कचऱ्याची विल्हेवाट, वाहतूक नियोजन, उर्जा संवर्धन, स्त्रियांची सुरक्षा इत्यादी समस्या अगदी आरामात सोडवण्यात येतील. 'अच्छे दिन' च्या प्रतीक्षेत असलेला अंध-मोदिभक्तांचा व मध्यम वर्गातील अराजकीय, कूपमंडूक मानसिकतेचा एक हिस्सा अशा शहरात राहण्याचे स्वप्न बघत आहे जिथे पावला-पावलावर वाई-फाई असेल जेणे करून ते हव्या त्या ठिकाणहून इंटरनेटशी कनेक्ट होऊ शकतील, जिथे ब्लू टूथ वापरून ते आपल्या घरातील दिवे, उपकरणे नियंत्रित करू शकतील, जिथे पावलापावलावर सीसीटीव्ही लावलेले असतील जेणे करून भुरटे चोर, बलात्काऱ्यांपासून आतंकवाद्यांपर्यंत सर्वांना पकडणे सहज शक्य होईल. परंतु आधुनिक जगातील ह्या मुन्गेरीलालांच्या दिवा स्वप्नांवर जास्त भाष्य न करता आपण बघूयात कि ह्या 'स्मार्ट सिटीज'मुळे सामान्य कष्टकरी जनतेच्या जीवनात काय बदल होईल?

मोदी सरकार व तिच्या अंधभक्तांनी स्मार्ट सिटी चे जे पिल्लू सोडले आहे त्यावर कुठलाही तर्कशील माणूस त्यांना हा प्रश्न विचारेल की सध्याच्या शहरांमध्ये जे कोट्यावधी कष्टकरी लोक नरकप्राय स्थितीमध्ये रहात आहेत त्यांचा विचार सरकार का करत नाही? देशाच्या शहरांमध्ये वेगाने पसरत चाललेले शॉपिंग मॉल्स, फ्लाय-ओव्हर, लग्झरी अपार्टमेंटसच्या झगमगाटाच्या बाहेर पडून कामगार-कष्टकऱ्यांच्या वस्त्यांची स्थिती बघण्याचे धैर्य दाखवले तर आपल्याला ह्या देशातील शासक वर्गाकडून दाखवण्यात येणारी शेखचिल्ली स्वप्नं ही विकृत चेष्टाच वाटेल.

ह्या शहरांमधील गगनचुंबी इमारती व शॉपिंग मॉल्सच्या झगमगाटात आंधळा झालेला आणि कष्टकरी वर्गाशी कुठलेही सोयरसुतक नसलेला मध्यमवर्ग सामान्यपणे देशाबद्दल माहिती टीव्ही, वृत्तपत्रे व इंटरनेटच्या माध्यमातून गोळा करतो. ही मध्यमवर्गीय जमात विकसित होणाऱ्या शहरांचे वास्तव जाणून घेण्यासाठी जर कामगारांच्या वस्त्यांमध्ये जाण्याची हिम्मत करेल तर त्यांना समजू शकेल की ज्या कष्टकरी जनतेमुळे त्यांच्या शहरांचा झगमगाट टिकून आहे, ती जनता त्यांचे आयुष्य अंधारात व्यतीत करत आहे. कामगार वस्त्यांमध्ये पहाटे लवकर उठून सुद्धा पाण्यासाठी रांगा लागलेल्या असतात. एवढे करून सुद्धा पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळत नाही. पिण्याचे पाणी बाटल्यांमध्ये भरून विकण्याचा धंदा तर कामगार वस्त्यांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात बहरला आहे. साहजिकच जेमतेम पोट भरण्यापुरते कमावणाऱ्या कष्टकरी जनतेला स्वच्छ पिण्याचे पाणी सुद्धा मिळत नाही. अशुद्ध व कमी पाणी पिल्यामुळे ते आणि त्यांची मुले सतत आजारी पडतच असतात. ह्या वस्त्यांमध्ये गटारे उघडी असतात व घाणीने भरलेली असतात. त्यातून मल निस्सारणाचे पाणी तसेच वाहत असते. कचरा उघड्यावर पडलेला असतो, जो विविध आजारांचे कारण बनतो. ह्या वस्त्यांमध्ये विजेची सुद्धा खात्री नसते. दिवसातून कित्येक तास वीज नसते किंवा कधी कधी तर दिवसभर विजेचा पत्ता नसतो. ह्या वस्त्यांमधील रस्त्यांची दुर्दशा बघून हा शहराचा भाग आहे असे कोणालाही वाटणार नाही.



मुंबईत एका झोपडपट्टी



धोलेरा, गुजरात मध्ये प्रस्तावित 'स्मार्ट सिटी'

कुठल्याही सरकारची प्राथमिकता ही कष्टकरी वर्गाच्या अश्या वस्त्यांमध्ये वीज, पाणी, स्वच्छता ह्या सारख्या मूलभूत सुविधा देण्याची असली पाहिजे. परंतु 'अच्छे दिन' चे वचन देऊन सत्तेत आलेले मोदी सरकार आता जनतेला 'स्मार्ट सिटी'चे दिवास्वप्न दाखवत आहे.

चला बघूयात की ही स्मार्ट सिटी असते तरी कशी? ह्या योजने अंतर्गत कश्या प्रकारची शहरे वसवली जातील आणि ह्या नवीन शहरांमध्ये कामगारांची स्थिती काय असेल? जगभरात पसरलेल्या आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर आपल्या उत्पादनांना नवीन बाजारपेठ मिळावी याकरिता आई.बी.एम. व सिस्को सारख्या कंपन्यांनी स्मार्ट सिटीची संकल्पना पुढे आणली. ह्या अंतर्गत जगभरातील सरकारांना हे सांगण्यात आले की माहिती व तंत्रज्ञानाच्या मदतीने पाणी, वीज यांचा पुरवठा, कचऱ्याची विल्हेवाट, वाहतूक नियोजन, उर्जा संवर्धन, स्त्रियांची सुरक्षा इत्यादी मूलभूत सुविधा पुरवण्यात येतील. चीन व दक्षिण कोरिया सारख्या देशांनी ह्यापूर्वीच स्मार्ट सिटी वसवल्या आहेत. ही गोष्ट अलहिदा की ह्या शहरांचा खर्च इतका प्रचंड आहे की लोकांना तिथे राहणे परवडत नाही आणि कमी लोकसंख्येमुळे ह्यातील कैक स्मार्ट सिटीज 'घोस्ट सिटीज' म्हणून ओळखल्या जातात.

मोदी सरकार 'स्मार्ट सिटी'ची ही संकल्पना भांडवली विकासाला गती देण्यासाठी व परकीय गुंतवणुकीला चालना देण्यासाठी वाजत-गाजत पुढे रेटत आहे. इथे लक्षात घेण्यासारखी बाब ही आहे की ह्या स्मार्ट सिटीज औद्योगिक कॉरीडॉर्सच्या आसपास वसवण्यात येतील. ह्या स्मार्ट सिटीज मध्ये प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र ओळखपत्र देण्यात येईल आणि त्यात वास्तव्यास असलेल्या प्रत्येक नागरिकावर माहिती-तंत्रज्ञानाच्या साह्याने पाळत ठेवण्यात येईल. ह्या योजनेचे समर्थक उघडपणे हे कबूल करतात की खाजगी बाबींवर अतिक्रमण करणारी अशी केंद्रीय पाळत यंत्रणा कुठल्याही अनैसर्गिक हालचालींवर तत्काळ नियंत्रण मिळवता येण्याच्या दृष्टीने गरजेची आहे. हे स्पष्ट आहे की अश्या प्रकारची पाळत ठेवण्यामागे त्यांचा हेतू कष्टकरी जनतेच्या हालचालींवर नजर ठेवणे हाच आहे, जेणे करून ते धनदांडग्यांच्या विलासी आयुष्यात कुठलाही व्यत्यय आणू शकणार नाहीत. ह्या व्यतिरिक्त अधोरेखित करण्यासारखी अजून एक गोष्ट म्हणजे ह्या शहरांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या साह्याने पुरवण्यात येणाऱ्या सुविधा इतक्या खर्चिक असतील की त्यांचा उपभोग घेण्याची ऐपत केवळ श्रीमंत व उच्च-मध्यमवर्गाकडे असेल. निम्न-मध्यमवर्ग व कामगार वर्ग ह्या शहरांमध्ये दुय्यम दर्जाचा नागरिक म्हणून शहर प्रशासनाच्या कडेकोट पाळतीखाली वेगळ्या 'घेट्टो' (पृथक वस्तीज) मध्ये जगण्यास बाध्य असेल.

जागतिकीकरणाच्या ह्या युगामध्ये एकीकडे उत्पादन प्रक्रियेशी संबंधित कार्यशक्तीच्या कंत्राटीकरण, ठेकेदारीकरणामुळे ते छोट्या छोट्या कारखान्यांमध्ये विखुरल्यामुळे कामाच्या ठिकाणी कामगारांच्या एकतेचा आधार कमकुवत झाला आहे. तर दुसऱ्या बाजूला ह्या युगात शहरीकरणाच्या प्रक्रियेतून स्पष्ट वर्गीय ध्रुवीकरण झाल्यामुळे कामगारांच्या रहिवासी वस्त्यांमध्ये त्यांच्या संघटीत होण्याच्या शक्यता पूर्वी पेक्षा खूप वाढल्या आहेत. म्हणून आज कामगार चळवळीला 'स्मार्ट सिटी सारख्या योजनांचे कामगार विरोधी स्वरूप उघड केले पाहिजे आणि त्याच बरोबर कामगार वस्त्यांमध्ये पाणी, वीज, रस्ते, नाले, स्वच्छता ह्या सारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागण्यांभोवती कामगारांना संघटीत करण्याचे काम आपल्या अजेंड्यावर प्रामुख्याने आणावे लागेल.

**•आनंद**

**मराठी अनुवाद - अमित शिंदे**

# भगतसिंह जे म्हणाले ते आजही प्रासंगिक आहे!

समाजाचे प्रमुख अंग असूनही आज कामगारांना त्यांच्या प्राथमिक हक्कांपासून वंचित ठेवले जाते. शोषण करणारे भांडवलदार त्यांच्या निढळाच्या कमाईतून निर्माण होणारी सर्व संपत्ती हडपून टाकतात. दुसऱ्याचे अन्नदाते असणारे शेतकरी आज त्यांच्या कुटुंबासह एकेका दाण्यासाठी मोताद बनले आहेत. जगभरच्या बाजारपेठांसाठी कपडे उपलब्ध करून देणाऱ्या विणकऱ्याला आपले व पोराबाळांचे शरीर झाकण्याइतकेदेखील कापड मिळत नाही. सुंदर महाल निर्माण करणारे गवंडी, लोहार, सुतार स्वत: मात्र घाणेरड्या वस्त्यांत राहून आपली जीवनयात्रा समाप्त करतात. या विपरित समाजातील शोषक भांडवलदार त्यांच्या छोट्यामोठ्या लहरींखातर लाखो-कोट्यावधींची उधळपट्टी करतात.

**(बॉंब खटल्यातील दिल्ली सेशन कोर्टात भगतसिंह व बटुकेश्वर दत्त यांनी दिलेली ऐतिहासिक जबानी)**



आम्ही हे सांगू इच्छितो की युद्ध पेटले आहे, आणि जोपर्यंत मूठभर बलवान बांडगुळे स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी, भारतातील मोलमजुरी करणाऱ्यांच्या आणि सामान्य जनतेच्या निसर्गदत्त साधनांचे शोषण व लूट करत राहतील, तोपर्यंत हे युद्ध चालू राहील- मग ते शुद्ध ब्रिटिश भांडवलदार असोत किंवा ब्रिटिश-भारतीय असोत किंवा केवळ हिंदुस्थानी (भांडवलदार) असोत. हे कावेबाज शोषण, ते मिश्र वा शुद्ध भारतीय स्वरूपाच्या नोकरशाही यंत्रणेच्या माध्यमातून पार पाडोत, त्यामुळे परिस्थितीत काहीही फरक पडत नाही.

**फासावर लटकवले जाण्यापूर्वी तीन दिवस ला फासावर चढवण्यापेक्षा बंदुकीच्या गोळ्यांनी उडवावे अशी मागणी करताना भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यां तरफे पंजाबच्या गव्हर्नरला लिहिला गेला पत्रचा एक अंश**

• संपादक मंडळ – नारायण खराडे, विराट चौधरी • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६९९०३५८९, ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३ • व्ही २ एंटरप्राइज, गाला-१०, सर्वे न ३/१३, वालीव, वसाई पूर्व, ठाणे-४०१२०८, फोन न. ०२५०-६०६६६०८ कडून मुद्रित